cmyk

**संपादकीय**

## चेंगराचेंगरी म्हणजे बेशिस्तीचाच परिपाक!

गत काही वर्षांत देशात चेंगराचेंगरीच्या घटना का घडत आहेत आणि त्यात निष्पापांचे बळी का जात आहेत यावर गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. मग ती घटना एखाद्या धार्मिक कार्यक्रमातील असो, रेल्वे ब्रिजवर प्रवाशांच्या चेंगराचेंगरीची असो वा स्टेडियममधील चेंगराचेंगरीची असो.


दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### जम्मू-काश्मीरमध्ये लष्कराच्या वाहनावर दहशतवाद्यांचा हल्ला; २ जवान जखमी

श्रीनगरः जम्मू-काश्मीरमधील कठुआ जिल्ह्यातील बिल्लावर परिसरात लष्कराच्या वाहनावर दहशतवाद्यांनी सोमवारी (दि.८) हल्ला केला. या हल्ल्यात लष्कराचे दोन जवान जखमी झाले आहेत. त्यांना रुग्णालयात दाखल केले आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दहशतवाद्यांनी एका टेकडीवरून लष्कराच्या वाहनावर गोळीबार केला. त्यांनी लष्कराच्या वाहनावर ग्रेनेडही फेकले, अशी माहिती देण्यात आली.

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-८९ | मंगळवार दि.९ जुलै २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये

# एमएसपी नवीन स्वरूपात आणा

## एसबीआयकडून अर्थमंत्र्यांना महत्वपुर्ण अहवाल, पीक विविधतेसोबतच खरेदीमध्ये खासगी युनिट्सचा समावेश करण्याची सूचना

**पुणे । प्रतिनिधी**

या महिन्यात सादर होणाऱ्या २०२४-२५ च्या सर्वसाधारण अर्थसंकल्पाची प्रत्येकजण आतुरतेने वाट पाहत आहे. विशेषतः शेतकऱ्यांना अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केलेल्या घोषणांकडून खूप आशा आहेत. यामुळे याकडे लक्ष लागलेले आहे. दरम्यान, एसबीआयच्या संशोधन अहवालात कृषी क्षेत्राची किमान आधारभूत



किंमत (एमएसपी) नवीन स्वरूपात आणण्यास सांगितले आहे. अहवालात असे सुचवण्यात आले आहे की, सरकारने वित्तीय भार कमी करण्यासाठी आणि शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांना किमान भाव मिळावा यासाठी खरेदीमध्ये खासगी युनिट्सचा समावेश करावा. याशिवाय पीक विविधतेला प्रोत्साहन दिले पाहिजे आणि हवामानावर आधारित पिकांना प्रोत्साहन दिले पाहिजे, यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल, असे म्हटले आहे.

### उदरनिर्वाह क्रेडिट कार्ड सुरू करण्यावर भर

अहवालात उदरनिर्वाह क्रेडिट कार्ड (एलसीसी) सुरू करण्याची आणि कृषी-संबंधित क्षेत्रांसाठी सर्वसमावेशक क्रेडिट हमी निधी स्थापन करण्याची शिफारस केली आहे. यामुळे ग्रामीण भागातील मागणी वाढण्यास आणि पतपुरवठा व्यवस्थापित करण्यात मदत होईल. या प्रणालीमुळे लहान आणि अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक गरजा सहज पूर्ण होतील.

वेगवेगळ्या पिकांसाठी किमान आधारभूत किंमत (एमएसपी) वाढवण्याची मागणी शेतकरी सुरुवातीपासून करत आहेत, पण केवळ एमएसपी वाढवून शेतकऱ्यांना फायदा होईल का? या संदर्भात स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) च्या संशोधन अहवालात काही महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत, ज्यात एमएसपी प्रणाली नवीन स्वरूपात आणणे, खरेदीमध्ये खासगी युनिट्सचा समावेश करणे आणि उदरनिर्वाह क्रेडिट ◀◀ पान २ वर

# आणखी दोन दिवस जोर कायम!

## राज्यातील बहुतांशी भागात मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यात रविवारपासून पाऊस पडत आहे. विदर्भ, कोकण आणि मराठवाड्यात काही ठिकाणी जोरदार पावसाने दाणादाण केली आहे. हवामान विभागाने आणखी दोन दिवस पावसाचा जोर जास्तच राहील, असा अंदाज दिला आहे.**

राज्याच्या बहुतांशी भागात पाऊस पडत आहे. कोकणात पावसाचा जोर अधिक आहे. सिंधुदूर्ग, रत्नागिरीला रेड अलर्ट देण्यात आला आहे तर रायगड, मुंबई, ठाणे आणि पालघर जिल्ह्यात जोरदार ते अतिजोरदार



पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. पुणे आणि सातारा जिल्ह्यातही घाटमाथ्यावर काही ठिकाणी अतिजोरदार पावसाचा अंदाज आहे. तर कोल्हापूर जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. संपूर्ण विदर्भ, संपूर्ण मराठवाडा आणि खानदेशातील सर्वच जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी जोरदार पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. पावसाने मागील दोन दिवसांमध्ये राज्यातील बहुतांशी भागांमध्ये हजेरी लावली. कोकण किनारपट्टीला पाऊस चांगलाच झोडपून काढत आहे. विदर्भातील अकोला, बुलडाणा आणि वाशीम जिल्ह्यातही चांगला पाऊस झाला. बुलडाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यात पावसाचा जोर जास्त होता. विदर्भतील इतरही जिल्ह्यांमध्ये कमी अधिक प्रमाणात पाऊस पडत आहे. हवामान खात्याने मुंबईला ऑरेंज अलर्ट दिला असून, राज्य आपत्ती नियंत्रण विभाग, मुंबई महापालिका, ◀◀ पान २ वर

# रेल्वे दुहेरीकरणासाठी एकाही नागरिकांचे घर बाधित होऊ देणार नाही-धनंजय मुंडे यांचा परळीकरांना दिलासा

## बाधा पोचणाऱ्या नागरिकांशी व्हीडिओ कॉलवरून संवाद

### वाल्मिक अण्णा कराड,ॲड.राजेश्वर चव्हाण यांच्या सोबतीने हजारो परळीकर नागरिकांनी दिले निवेदन

परळी वैद्यनाथ। प्रतिनिधी

परळी वैद्यनाथ ते परभणी रेल्वे पटरी चे दुहेरीकरण करणे प्रस्तावित असून यासाठी दिनांक १९ जून रोजी केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने परळी वैद्यनाथ ते परभणी रेल्वे पटरी चे दुहेरीकरण करणे प्रस्तावित असून यासाठी दिनांक १९ जून रोजी केंद्रीय रेल्वे मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या राजपत्रात परळी शहरातील लोकवस्ती असलेल्या अनेक भागातील घरे प्रभावित होणार असल्याचे दिसत असल्यामुळे



आज परळीकरांच्या वतीने ना.धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर आबा चव्हाण, ज्येष्ठ नेते वाल्मिक अण्णा कराड यांच्या नेतृत्वात आज परळीकरांच्या वतीने सदर राजपत्र रद्द करण्यात यावे, असे निवेदन उपविभागीय ◀◀ पान २ वर

### केजरीवालांच्या याचिकेवर न्यायालयाची ईडीला नोटीस

नवी दिल्लीः दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल सध्या तिहार तुरुंगात आहेत. तुरुंगात असताना वकिलांना आठवड्यातून ४ वेळा भेटण्याची मागणी करणारी याचिका केजरीवालांनी दाखल केली होती. या याचिकेवर सोमवारी (८ जुलै) दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी झाली. यावेळी न्यायमूर्ती नीना बन्सल कृष्णा यांच्या खंडपीठाने तिहार तुरुंग अधिकारी आणि ईडीला नोटीस बजावली असून ७ दिवसांत उत्तर देण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता १५ जुलै रोजी होणार आहे. माझ्याविरुद्ध देशभरात ३५ वेगवेगळे खटले प्रलंबित आहेत. सध्या मला आठवड्यातून दोनदाच वकिलांना भेटण्याची परवानगी आहे. किमान चार वेळा वकिलांना भेटण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी केजरीवालांनी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत केली होती.

# बीडच्या तत्कालीन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ यांची पुणे येथे बदली

## महानगर परिवहन महामंडळाच्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पदाची घेणार जबाबदारी; परमेश्वर येवले, गणेश मोकाशे यांच्या पाठपुराव्याला यश

**बीड/पुणे । प्रतिनिधी**

तत्कालीन जिल्हाधिकारी दिपाताई मुधोळ यांची काही दिवसापुर्वी बदली झाली होती. त्यांच्या जागी बीड जि. प. चे सीईओ अविनाश पाठक यांची नियुक्ती करण्यात आली होती मात्र मुधोळ यांना नेमणुक दिली नव्हती. तर पुणे महानगर



परिवहन महामंडाळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक म्हणून भाप्रसे आशिष येरेकर यांची नियुक्ती केली होती. मात्र सामाजिक कार्यकर्ते परमेश्वर नाना येवले आणि पुणे येथील उद्योजक व दै. लोकतंत्रचे सहसंपादक गणेश मोकाशे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे येरेकर यांची नियुक्ती रद्द करुन भाप्रसे दिपाताई मुधोळ यांची नियुक्ती करावी, अशी मागणी केली होती. शेवटी त्यांच्या या पाठपुराव्याला यश आले असून एका चांगल्या अधिकाऱ्याची योग्य पदावर नियुक्ती झाल्याने पुणेकरांनी त्याचे कौतूक ◀◀ पान २ वर

# अवैध उत्खनन व अनाधिकृत वाहतुकीवर आळा घालणारे पथक नेमले पण कारवाया किती?

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यात अवैध वाळू-मुरूम उत्खनन जोमात सुरू आहे. महसूल व पोलीस प्रशासन याकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष करत असल्याचा गंभीर आरोप वंचितचे अजय सरवदे यांनी केला आहे. अवैध वाळू-मुरूम प्रकरणी असंख्य सामाजिक कार्यकर्त्यांनी असंख्य तक्रारी दिल्या आहेत परंतु त्यांच्या तक्रारीची साधी चौकशी जिल्हा प्रशासनाकडून केले जात नाही हे दुर्दैव आहे.**

जिल्हाधिकारी बीड यांनी

### पाठक साहेब पथकामध्ये नवसाचे कर्मचारी यांची नियुक्ती कशी होते -अजय सरवदे

अवैध गौण खनिज उत्खनन व अनाधिकृत वाहतूक यावर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हा खनीकर्म अधिकारी बीड यांच्या प्रमुख भूमिकेमध्ये जिल्हा पथक नेमले जाते. परंतु जिल्हा खनिकर्म अधिकारी यांच्याकडे इतर अतिरिक्त पदभार दिल्याने पथकाला पाहिजे तसा वेळ देता येत नाही. तसेच सदर समितीमध्ये डबल डबल कर्मचाऱ्यांची नावे घेतली जात आहेत. या जिल्हा पथकातील काही कर्मचाऱ्यांचे वाळूमाफीयांशी लागेबांधे असल्याने सदर पथक कारवाई करताना दिसून येत नाही. दोन्ही पथकाने आतापर्यंत केलेल्या कार्यवाहीचा दैनिक प्रगती अहवाल तपासावा जेणेकरून सत्यता उघड उघड लक्षात येईल. अवैध गौण खनिज उत्खनन व अनाधिकृत वाहतुकीसाठी ◀◀ पान २ वर

# शरद पवार यांच्या गटाला निवडणूक आयोगाची मान्यता

## आता विधानसभेतही तुतारी चिन्ह कायम राहणार, देणगीही स्विकारता येणार

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

केंद्रीय निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या मागणीला मान्यता दिली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत शरद पवार यांच्या नेतृत्वातील पक्षाला लोकसभा निवडणुकीत वापरलेले तुतारी चिन्ह आगामी विधानसभा निवडणुकीसही वापरण्यास मान्यता मिळाली आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीतही शरद पवार गटाचे आता तेच चिन्ह असणार आहे. निवडणूक आयोगाच्या या निर्णयामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला मोठा दिलासा मिळाला आहे. तसेच शरद पवार यांच्या पक्षाला आता देणगी स्वीकारता येणार आहे. निवडणूक आयोगाने तशी अधिकृत मान्यताच सोमवारी पक्षाला दिली आहे. त्यामुळे शरद पवार गटाला खूप मोठा दिलासा मिळाला आहे.

निवडणूक आयोगासमोर याबाबत सुनावणी पार पडली. या सुनावणीत शरद पवार यांच्या नेतृत्वातील पक्षाला देणगी स्वीकारण्यास ◀◀ पान २ वर

# बीड बायपासवर अपघात : दोन ठार

**बीड प्रतिनिधी**

**आयशर टेम्पोचे नियंत्रण सुटल्याने विचित्र अपघात झाल्याची घटना घडली आहे. यामध्ये दोघेजण ठार झाले असून, अन्य नागरिक गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना तात्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सदर अपघात सोमवार दि.८ रोजी सायंकाळी बीड बायपासवर घडली.**

बीड शहरालगत धुळे - सोलापूर या राष्ट्रीय महामार्गावरील छत्रपती संभाजी राजे चौका जवळ एक आयशर टेम्पो, हा मांजरसुंबा कडून येत होता, सदर आयशर टेम्पो भरधाव वेगात असल्याने, चालकाचा टेम्पो वरील ताबा सुटला आणि तो बाजूने जात असलेला छोट्या हत्तीला जाऊन धडकला. नंतर गॅस एजन्सीच्या रिक्षाला धडकला. तेथे अन्य दुचाकीस्वारही धडकले. सदर टेम्पो हा मालवाहू होता. ◀◀ पान २ वर



### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**

बीड,दि.८ जुलै २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ३.५० क्विंटल | २,३०१ | २,३०१ | २,३०१ |
| ज्वारी/हायब्रिड : ४२.५० क्विंटल | २,००० | २,६०२ | २,३४४ |
| मूग : १.०० क्विंटल | ७,२७६ | ७,५०१ | ७,३८८ |
| तूर : ४.०० क्विंटल | ९,००० | १०,६०१ | १०,००० |
| उडीद :०.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| बाजरी: १२.५० क्विंटल | २,५६० | २,६७० | २,५९६ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: ८४.०० क्विंटल | ४,४०० | ४,५२५ | ४,४७० |
| हरभरा: १.५० क्विंटल | ५,८०० | ५,८०० | ५,८०० |

# लंडनहून येणारी ती वाघनखं महाराजांची नाहीत?

## राज्य सरकार आता काय भुमिका घेणार?; या ठिकाणी आहेत खरी वाघनखं?





**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य सरकार कोट्यवधींचा खर्च करून लंडनमधून छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखं आणणार आहे. अफजल खान वधावेळी ही वाघनखं वापरली असल्याचा दावा राज्य सरकारने केला आहे. मात्र प्रत्यक्षात आणली जाणारी वाघनखं महाराजांनी अफजल खानाच्या वधावेळी वापरली असल्याचा कोणताच पुरावा नसल्याचे स्पष्टीकरण लंडनच्या विक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियमने दिले आहेत. इतिहास संशोधक इंद्रजीत सावंतांनी केलेल्या पत्र व्यवहारात विक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियमने हे स्पष्टीकरण दिले आहे. त्यामुळे महाराजांची वाघनखं नेमकी कोठे आहेत, याबाबत ◀◀ पान २ वर

### *ती वाघनखं साताऱ्यात?*

*छत्रपती शिवाजी महाराजांची अस्सल वाघनखं साताऱ्यात असल्याचा दावा इंद्रजीत सावंत यांनी केला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची अस्सल वाघनखे साताऱ्यातून बाहेर गेल्याची किंवा कोणाला भेट दिल्याचाही पुरावा नसल्याचे इंद्रजीत सावंत यांनी म्हटले आहे. १९४४ पर्यंत छत्रपती शिवाजी महाराजांचीत खरी वाघनखं साताऱ्यात होती. १९४५ मध्ये छापण्यात आलेल्या पुस्तकात ती वाघनखं साताऱ्यात असल्याचे पुरावे आहेत. अफझल खान वधासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी जी वाघनखं वापरली, ती साताऱ्यात छत्रपतींकडे होती, जलमंदिरात देवघरावर ती ठेवण्यात आली होती, असा दावाही इंद्रजीत सावंत यांनी केला आहे. राजकारण करायचं तर करा पण छत्रपती शिवाजी महाराजांबाबत खोटी माहिती देऊ नका असे आवाहनही इंद्रजीत सावंत यांनी केले आहे.*

### *राज्य सरकारच्या जीआरमध्ये काय?*

*तर छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखं परत आणण्याबाबत राज्य सरकारने काढलेल्या जीआरमध्ये मात्र ही वाघनखं महाराजांनी अफजल खानाच्या वधावेळी वापरली असल्याचा उल्लेख केला आहे. सन १६५९ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज आणि अफजल खानाच्या भेटीदरम्यान खानाने केलेल्या हल्ल्यास प्रत्यूत्तर म्हणून महाराजांनी वाघनखं वापरून खानाचा केलेला वध, या चित्त थरारक घटनेचा समावेश आहे. या प्रसंगी छत्रपती शिवाजी महारांनी वापरलेली वाघनखं लंडन इथल्या व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियम इथं जतन करण्यात आली आहेत. सदर वाघनखे जनसामान्यांच्या दर्शनाकरिता राज्यास तीन वर्षांकरिता उसनवार तत्वावर देण्यास म्युझियमने संमती कळवली आहे.*

cmyk

## अग्रलेख

# चेंगराचेंगरी म्हणले बेशिस्तीचाच परिपाक !

गत काही वर्षांत देशात चेंगराचेंगरीच्या घटना का घडत आहेत आणि त्यात निष्पापांचे बळी का जात आहेत यावर गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. मग ती घटना एखाद्या धार्मिक कार्यक्रमातील असो, रेल्वे ब्रिजवर प्रवाशांच्या चेंगराचेंगरीची असो वा स्टेडियममधील चेंगराचेंगरीची असो. बहुतेक दुर्घटना धार्मिक कार्यक्रमामध्ये किंवा कार्यक्रमानंतर घडल्याच्या दिसून येतात. अशा प्रकारची दुर्घटना घडली की नेहमीप्रमाणे चौकशी करण्याचे आदेश देऊन चौकशी समिती नेमली जाते, कालांतराने ही समिती आपला अहवाल सादर करते. खरे तर अशा प्रकारच्या अहवालांमध्ये जे निष्कर्ष काढण्यात आलेले असतात ते निष्कर्ष दिशादर्शक असतात. अशा प्रकारच्या दुर्घटना पुन्हा घडू नयेत म्हणून काळजी घेण्याचे संकेत त्यातून मिळू शकतात. परंतु दुर्दैवाने अशा अहवालांकडे गांभीर्याने पाहिले जात नाही, त्यांना केराची टोपली दाखविली जाते आणि दुर्घटना घडतच राहतात.

दुर्घटनांमध्ये वागायचे कसे याबाबतचे कोणतेही शिक्षण समाजाला दिले जात नाही. खरे तर शालेय शिक्षणात वर्गात जाताना किंवा वर्गातून बाहेर पडताना रांगेत जाण्याचे शिक्षण सर्वांनाच मिळालेले असते. पण हे शिक्षण कालौघात विसरले जात आहे असे म्हणता येईल. गर्दीमध्ये प्रत्येकालाच पुढे जाण्याची घाई असल्याने आपण इतरांना दुखापत करून अथवा इतरांच्या मृत्यूला कारणीभूत ठरून पुढे जात आहोत याचा विचारच केला जात नाही. प्रत्येकाला आपलाच जीव वाचवायची घाई असल्याने या गदारोळात दुर्घटना घडून मृत्यूंची संख्या वाढणे अपरिहार्य असते. आगीसारख्या दुर्घटनेत हेच दिसून येते. आगीत होरपळून मरण्यापेक्षा आगीच्या भीतीने चेंगराचेंगरी होऊन मरणाऱ्यांची संख्या अधिक असते. आपत्कालीन परिस्थितीमध्ये शिस्तीने वागायचे कसे याबाबतचे कसलेही औपचारिक शिक्षण देण्यात येत नाही, ते आता देण्याची गरज आहे. कोणत्याही ठिकाणी आत जाण्याची वा बाहेर येण्याची जी घाई असते तीच जीवघेणी ठरू शकते. एखाद्या धार्मिक कार्यक्रमाचे ज्यांनी आयोजन केलेले असते त्यांनीच त्या ठिकाणची संपूर्ण जबाबदारी घेण्याची गरज असते. कारण त्यांनाच माहीत असते की किती लोक जमणार आहेत. हाथरस दुर्घटनेनंतर फरार झालेले भोलेबाबा अजूनही बेपत्ता आहेत. सत्संगाच्या आयोजनातील सहा सेवादारांना अटक करण्यात आली आहे. त्यात दोन महिलांचा समावेश आहे. या सेवादारांचा प्रमुख मात्र अजून बेपत्ता आहे. भोलेबाबाला चौकशीसाठी का बोलावले जात नाही हे एक गूढच आहे.

टीम इंडियाच्या स्वागत प्रसंगी दुर्घटना घडली नाही ही आनंदाची गोष्ट. बार्बाडोसमध्ये द. आफ्रिकेला पराभूत करून टीम इंडियाने टी-२० विश्वकप जिंकला आणि देशभरात जल्लोष झाला. भारतीय संघाचे मायदेशात आगमन झाले. मुंबईत त्यांच्या स्वागतासाठी लाखो मुंबईकरांनी मरीन ड्राईव्हवर गर्दी केली होती. लाखोंच्या संख्येने क्रिकेटप्रेमी रस्त्यावर उतरले होते. वानखेडे स्टेडियमही चाहत्यांनी खच्चून भरले होते. मात्र, मरीन ड्राईव्हवरील रॅलीला, त्यांच्या आनंदाला गालबोट लागलेच. कारण तेथील तुफान गर्दीमुळे अनेकांना त्रास झाला, बऱ्याच जणांचे श्वास कोंडले, गुदमरू लागल्याने त्यांची तब्येत बिघडली. अनेकांच्या हातापायाला दुखापत झाली. जखमींपैकी काहींना व्हीटी येथील जीटी रुग्णालयात नेण्यात आले. काही जण बेशुद्धही झाले. प्रचंड गर्दीमुळे एक तरुणी बेशुद्ध झाली. तेथील एका पोलिस कर्मचाऱ्याने तिला खांद्यावर टाकले आणि गर्दीतून वाट काढत उपचारासाठी रुग्णालयात नेले. या गर्दीवर नियंत्रण ठेवणे पोलिसांना अवघड झाले. त्यामुळे लाठीमार करावा लागला. अनेक चाहते स्टेडियममध्ये प्रवेश करण्यासाठी धडपडत होते. त्यामुळे चेंगराचेंगरीची परिस्थिती निर्माण झाली. भारतीय खेळाडूंनी क्रिकेट रसिकांच्या उत्साहाला मनापासून दाद दिली. मात्र, हा उत्साह काही चाहत्यांना त्रासदायक ठरला. मिरवणुकीनंतरचे चित्र धक्कादायक होते. मिरवणुकीच्या मार्गावर चपला विखुरल्या होत्या. मरीन ड्राईव्हवर आजूबाजूला उभ्या असलेल्या गाड्यांच्या छतांचे नुकसान झाले होते. चाहते कारच्या छतावर उभे राहून नाचत होते. त्यामुळे गाड्यांचे नुकसान झाले. गर्दी वाढत गेल्याने ती नियंत्रणाबाहेर गेली. स्टेडियमची आसनक्षमता ३५ ते ४० हजारांची असताना त्यापेक्षा अधिक क्रिकेटप्रेमी आतमध्ये उपस्थित होते. जितके चाहते स्टेडियममध्ये होते त्यापेक्षा अधिक स्टेडियमच्या बाहेर आणि रस्त्यावर होते. पावसाची रिमझिम सुरू असतानाही मुंग्यासारखे लोक रस्त्यावर दिसत होते. टीम इंडियाच्या स्वागत प्रसंगी कोणतीही दुर्घटना घडली नाही, ही आनंदाची गोष्ट. भविष्यात एखादी अप्रिय घटना घडणार नाही याची बीसीसीआयने काळजी घ्यायला हवी.

# महाराष्ट्राला 'सर्वोत्कृष्ट कृषी राज्य' पुरस्कार!

## ११ जुलै रोजी होणार दिल्लीत वितरण; मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कृषीमंत्री धनंजय मुंडे स्वीकारणार पुरस्कार

**मुंबई । प्रतिनिधी**

**माजी सरन्यायाधीश, केरळचे राज्यपाल न्यायमूर्ती पी. सथाशिवम यांच्यासह १५ जणांच्या अध्यक्षतेखालील कृषी नेतृत्व पुरस्कार समितीने महाराष्ट्र राज्याला २०२४ सालचा 'सर्वोत्कृष्ट कृषी राज्य' पुरस्कार देण्याची घोषणा केली आहे. येत्या ११ जुलै रोजी दिल्लीतील हॉटेल हॉलिडे इन मध्ये १५ व्या 'एग्रीकल्चर लीडरशिप कोन्क्लेव्ह'मध्ये या पुरस्काराचे वितरण केले जाणार असून राज्य सरकारच्या वतीने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच कृषिमंत्री धनंजय मुंडे हा पुरस्कार स्वीकारणार आहेत. एग्रीकल्चर टुडे च्या वतीने या पुरस्काराची सुरुवात २००८ सालापासून करण्यात आलेली आहे.**

महाराष्ट्र शासनाने मागील वर्षात पर्यावरणाच्या संरक्षणासह अन्नसुरक्षा, सर्वात मोठी बांबू लागवड, तृणधान्य अभियान, औष्णिक वीज निर्मितीत बायोमास चा वापर यांसारखे अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले असून १.७ दशलक्ष हेक्टर क्षेत्राचे १२३ मेगा सिंचन प्रकल्प, पंतप्रधान किसान सन्मान निधी दुप्पट करणारे देशातील पहिले राज्य, त्याचबरोबर ४.६३ लाख शेतकऱ्यांना नॅनो युरिया व नॅनो डीएपी खतांचे वितरण, सूक्ष्म बाजरी कार्यक्रम, डाळींच्या उत्पादनात देशात अव्वल स्थान, तसेच एक रुपयात पिक विमा योजना राबवणारे देशातील एकमेव राज्य असे अनेक उपक्रम यशस्वीरित्या राबवले आहेत. यामुळे लाखो शेतकऱ्यांवर सकारात्मक परिणाम झाला असून ग्रामीण कृषी क्षेत्रातील समृद्धीला लक्षणीय चालना मिळाली असल्याचे पुरस्कार समितीचे निष्कर्ष आहेत. कृषी क्षेत्रात नाविन्यपूर्ण धोरणे आणि उच्च प्रभावी विकासात्मक उपक्रमांद्वारे कृषी आणि ग्रामीण समृद्धीच्या प्रगतीसाठी महाराष्ट्राच्या विशेष योगदानाबद्दल हा पुरस्कार देण्यात येत आहे. एग्रीकल्चर लीडरशिप कॉन्क्लेव्ह या परिषदेत प्रमुख भागधारकांचा मेळावा केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग विकास मंत्री नितीन गडकरी, यांच्यासह केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान, ब्राझील, अल्जेरिया, नेदरलँड इत्यादी देशांचे राजदूत, तसेच महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, हरियाणा, हिमाचल प्रदेश, नागालँड आदी राज्यांचे मंत्री यांचा समावेश असणार आहे. २००८ साली या पुरस्काराची प्रथम सुरुवात करण्यात आली असून कृषी क्रांतीचे प्रणेते प्रा एम एस स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखालील पुरस्कार समितीने सर्वात पहिल्यांदा हा पुरस्कार आंध्र प्रदेश या राज्याला प्रदान केला होता. आतापर्यंत या पुरस्काराने माजी कृषिमंत्री शरद पवार, केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान, अखिलेश यादव, दिवंगत नेते प्रकाश सिंह बादल, वर्गीस कुरियन, एम एस स्वामीनाथन इत्यादी महानुभावांचा गौरव करण्यात आलेला असून स्व. स्वामीनाथन यांनी दहा वर्ष या संस्थेचे अध्यक्षपद भूषविलेले आहे. तर सध्या डॉ. एम.जे. खान हे या संस्थेचे अध्यक्ष आहेत. २०२३ सालचा सर्वोत्कृष्ट कृषी राज्य पुरस्कार बिहार तर २०२२ सालचा तमिळनाडू आणि उत्तर प्रदेश या राज्यांना हा पुरस्कार देण्यात आला होता.

## सर्वोच्च न्यायालयाने दिव्यांगाच्या चित्रणाबाबत घेतले आक्षेप

### मिथक तयार करू नका, अचूक चित्रण मांडा

**नवी दिल्ली। वृतसंस्था**

दृकश्राव्य अर्थात व्हिज्युअल मिडीयात दिव्यांग व्यक्तींबाबत भेदभाव करण्यात येत असल्याचे चित्रण एकसूरी दाखविण्यात येते. मात्र अशा पध्दतीचे चित्रण करण्याऐवजी निर्मात्यांनी मिथक, थट्टा निर्माण करण्याऐवजी दिव्यांगाचे अचूक चित्रण केले पाहिजे आणि त्यांचे अचूक प्रतिनिधित्व केले पाहिजे, असे मत सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डी.वाय. चंद्रचूड यांनी सोमवारी एका याचिकेवरील सुनावणी दरम्यान व्यक्त केले. सरन्यायाधीश डी वाय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला यांच्या खंडपीठाने ''पाथब्रेकिंग'' म्हणून वर्णन केलेल्या निकालात, अपंग व्यक्तींना कलंकित करणारे 'अपंग', 'स्पास्टिक' इत्यादी शब्दांचा निषेध केला. सोनी पिक्चर्स निर्मित 'आंख मिचोली' या चित्रपटातील दिव्यांग व्यक्तींच्या कथित असंवेदनशील चित्रणाला आव्हान देणारे कार्यकर्ते निपुण मल्होत्रा यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने हा निकाल दिला.

## हिंगोलीत पीक विम्यावरून शेतकरी आक्रमक; कार्यालय फोडले

**हिंगोली। प्रतिनिधी**

**राज्य शासनाने मोठा गाजावाजा करून एक रूपयात पिकविमा योजना आणली. परंतू रब्बी हंगामात अतिवृष्टमुळे झालेल्या हरभरा पिकाचा मंजूर झालेला पीक विमा मोजक्याच शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाला. इतर शेतकरी मात्र पिकविम्यापासून वंचित राहिल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी सोमवारी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास हनुमान नगर भागात असलेल्या पिकविमा कंपनीच्या कार्यालयात घुसून कार्यालयातील खुर्च्या व इतर साहित्याची तोडफोड केली. दुसऱ्या घटनेत लाख येथील शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील हरभऱ्याच्या नुकसानीचा पिकविमा भेटला नसल्याने थेट जिल्हाधिकारी कार्यालय गाठत आंदोलन केले.**

रब्बी २०२३ च्या हंगामाचा पीकविमा काढण्यासाठी राज्य शासनाने एचडीएफसी जनरल इन्शुरन्स कंपनीची हिंगोली जिल्ह्यासाठी नेमणुक केली होती. हरभरा पिकाचा हजारो शेतकऱ्यांनी पीकविमा काढला होता. दरम्यान नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे हरभरा पिकाचे मोठे नुकसान झाले. संपूर्ण पिक उद्धवस्त झाले होते. त्यामुळे शेतकऱ्यांनी पीकविमा कंपनीकडे नुकसानीच्या तक्रारी देखील नोंदविल्या होत्या. मागील आठ दिवसांपुर्वी नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या खात्यावर काही रक्कम जमा झाली होती. परंतू मोजक्याच शेतकऱ्यांच्या खात्यावर विम्याची रक्कम जमा झाल्याचा आरोप शेतकऱ्यांमधून होऊ लागला आहे. रब्बी हंगामाचा पीकवमा मिळावा या मागणीसाठी तसेच तक्रार करूनही विमा का मिळाला नाही या बाबीची माहिती घेण्यासाठी जिल्ह्यातील ४० ते ५० शेतकरी सोमवारी दुपारी हनुमान नगर भागात असलेल्या कंपनीच्या कार्यालयात गेल्यानंतर त्यांनी संबंधित कर्मचाऱ्यास विचारणा केली. परंतू कर्मचाऱ्यांनी दिलेल्या उत्तराने शेतकऱ्यांचे समाधान झाले नाही. संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी अखेर कार्यालयातील खुर्च्या व इतर साहित्याची तोडफोड केली. शेतकरी आक्रमक झाल्याचे लक्षात येताच कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी धूम ठोकली.

# विधानपरिषद निवडणुकीत बहुजन विकास आघाडीची ३ मतं ठरणार गेम चेंजिंग, कोणाला करणार मतदान? जाणून घ्या समीकरण

**मुंबई । प्रतिनिधी**

**विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी १२ जुलै रोजी निवडणूक पार पडणार आहे. विधानपरिषदेच्या ११ जागांच्या निवडणुकीसाठी १२ उमेदवार मैदानात उतरले आहेत. विधान परिषदेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने बहुजन विकास आघाडीची तीन मत गेम चेंजिंग ठरणार आहेत. त्यामुळे बहुजन विकास आघाडी विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी नेमक्या कोणत्या बाजूला? असा सवाल उपस्थित केला जात आहे.**

बहुजन विकास आघाडीने आपल्याला पाठिंबा द्यावा, यासाठी महाविकास आघाडी आणि महायुतीचे जोरदार प्रयत्न सुरू आहेत. हितेंद्र ठाकूर यांनी मागील दोन दिवसापासून विविध नेत्यांच्या भेटी घेण्यास सुरुवात केली आहे. त्यांनी राष्ट्रवादीचे सर्वसर्वा शरद पवार, ठाकरेंचे उमेदवार मिलिंद नार्वेकर, उपमुख्यमंत्री अजित पवार, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस अशा महाविकास आघाडी आणि महायुतीच्या दिग्गज नेत्यांच्या भेटी सुद्धा घेतल्या आहेत. ३ मतांमुळे भेटीगाठीला महत्त्व प्राप्त झाले आहे.

### कोणाची ताकद किती?

विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी २३ मतांचा कोटा असेल. विधानसभेत महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये कोणाची किती ताकद असेल आणि अकरावी जागा निवडून आणण्यासाठी मतांची जुळवाजुळव कशी करावी लागणार याची आकडेवारी जाणून घेऊया.

### दगाफटका टाळण्यासाठी आमदारांची हॉटेलवारी

विधानपरिषदेच्या निवडणुकीमुळे महाराष्ट्रात पुन्हा एकदा आमदारांच्या हॉटेलवारीला सुरुवात झाली आहे. विधानपरिषद निवडणुकीच्या तोंडावर उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेसह अजित पवारांच्या राष्ट्रवादीने आणि भाजपने आमदारांना हॉटेलमध्ये मुक्कामी ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे सर्व आमदार विधानपरिषदेच्या निवडणुकीदरम्यान, हॉटेलवर मुक्कामी असणार आहेत. याशिवाय, अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे आणि भाजपचे आमदार देखील हॉटेलवर मुक्कामी जाणार असल्याची माहिती आहे. १०,११ आणि १२ जुलै रोजी ठाकरेंचे १६ आमदार हॉटेलवर मुक्कामी असणार आहेत. त्याचदरम्यान उद्धाव ठाकरे हॉटेलमध्ये गाठीभेटी घेणार आहेत. कोणताही दगाफटका होऊ नये यासाठी उद्धव ठाकरेंनी हा निर्णय घेतला असल्याची माहिती आहे.

### महाविकास आघाडी

राष्ट्रवादी शरद पवार - १२
उद्धव ठाकरे शिवसेना - १५ + १ शंकरराव गडाख = १६
काँग्रेस - ३७
एकूण - ६५
महाविकास आघाडीला मतांची जुळवाजुळव करण्यासाठी चार किंवा त्यापेक्षा अधिक मतांची गरज पडेल.
छोटे घटक पक्ष
१) बहुजन विकास आघाडी -३
२) समाजवादी पक्ष - २
३) एमआयएम - २
४) मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी- १
५) शेतकरी कामगार पक्ष - १
एकूण - ९
महाविकास आघाडी एकूण आमदार - ६५
महाविकास आघाडीला पाठिंबा देऊ शकणारे पक्ष
१) समाजवादी २
२) एमआयएम २
३) मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी १
४) शेतकरी कामगार पक्ष १
महाविकास आघाडीला पाठिंबा देणारे पक्ष लक्षात घेऊन एकूण आमदार - ७१ आमदार

### महायुती आमदारांची संख्या

राष्ट्रवादी (अजित पवार) ४१
भाजपा - १०३
शिवसेना - ३८
महायुती पाठींबा देणारे आमदार
राष्ट्रवादी (अजित पवार)
१) देवेंद्र भुयार
२) संजयमामा शिंदे
राष्ट्रवादी + अपक्ष - ४३
भाजपला पाठिंबा देणारे आमदार
१) रवी राणा
२) महेश बालदी
३) विनोद अग्रवाल
४) प्रकाश आवाडे
५) राजेंद्र राऊत
६) विनय कोरे
७) रत्नाकर गुट्टे
भाजप + मित्र पक्ष आणि अपक्ष- १०३+ ७ = ११०
एकनाथ शिंदे शिवसेना- ३८
पाठिंबा देणारे आमदार - १०
१) नरेंद्र भोंडेकर
२) किशोर जोरगेवार
३) लता सोनवणे
४) बच्चू कडू
५) राजकुमार पटेल
६) गीता जैन
७) आशीष जैसवाल
८) मंजुळा गावीत
९) चंद्रकांत निंबा पाटील
१०) राजू पाटील
एकूण - शिवसेना + मित्र पक्ष आणि अपक्ष = ३८+१०= ४८
महायुती एकूण आमदार - २०१
महायुतीला आपले नऊ उमेदवार निवडून आणण्यासाठी आणखी सहा मतांची गरज पडणार आहे. त्यामुळे अपक्ष आमदारांवर महायुती या सगळयासाठी अवलंबून असेल.

## पान १वरून...

### एमएसपी नवीन

कार्ड (एलसीसी) सुरू करणे यांचा समावेश आहे. एसबीआयच्या संशोधन अहवालात सध्याच्या एमएसपी प्रणालीतील त्रुटींबद्दलही सांगितले आहे. ज्यामध्ये केवळ विशिष्ट पिकांवर लक्ष केंद्रित केल्याने, खासगी गुंतवणूक आणि निर्यात स्पर्धा दूर ठेवल्याने त्याचा विपरीत परिणाम होत असल्याचे सांगण्यात आले आहे. सध्या सरकार प्रामुख्याने गहू आणि तांदूळ खरेदी करते, जे एकूण कृषी उत्पादनाच्या केवळ ६ टक्के आहे. याउलट, पशुधन, भाजीपाला आणि फळे यांचा एकत्रितपणे ७१ टक्के कृषी उत्पादन आहे, परंतु त्यांना एमएसपीमध्ये पुरेशी जागा मिळत नाही. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी, अहवालात पायाभूत सुविधांमध्ये सार्वजनिक गुंतवणूक वाढवणे आणि मजबूत वितरण फ्रेमवर्क लागू करणे आवश्यक आहे. याशिवाय पिकांची साठवणूक, प्रतवारी, वर्गीकरण आणि किरकोळ विक्री यासारख्या कामांवरही भर देण्यात आला आहे. अहवालानुसार, या उपायांचा अवलंब केल्यास शेतकऱ्यांची स्थिती सुधारेल असे सांगितले जात आहे.

----------

### रेल्वे दुहेरीकरणासाठी एकाही नागरिकांचे

अधिकारी अरविंद लाटकर यांना देण्यात आले आहे. विकासाला कोणाचाही विरोध नाही, मात्र परळी गावाच्या दक्षिण बाजूने सदर भुसंपादन प्रस्तावित केले आहे, मात्र हे राजपत्र रद्द करून त्याऐवजी उत्तर दिशे कडून भुसंपादन करावे, जेणेकरून कुणाचेही घर बाधित होणार नाही, असेही निवेदनात म्हटले आहे. यावेळी कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी व्हीडिओ कॉल वरून उपस्थितांशी संवाद साधत कोणत्याही परिस्थितीत एकही व्यक्तीचे घर बाधित होणार नाही, याबाबत परिपूर्ण नियोजन करण्यात येईल, प्रसंगी यासाठी आपण रेल्वे मंत्र्यांशी सुद्धा चर्चा करून मार्ग काढू, त्यामुळे कोणीही काळजी करू नये, असे धनंजय मुंडे म्हणाले. राज्यात व केंद्रात महायुतीचे सरकार असल्याने काही विरोधकांकडून या बाबीचे राजकारण केले जात असून, नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, एकही व्यक्तीचे घर पडणार नाही, कुणाच्याही मर्जी शिवाय कुणाचीही जागा ना.धनंजय मुंडे हे बाधित होऊ देणार नाहीत, असा विश्वास ॲड.राजेश्वर चव्हाण यांनी उपस्थितांना दिला. कोणाचेही घर पडणार नाही, त्यासाठी मी स्वतः व धनंजय मुंडे साहेब प्राणांतिक प्रयत्न करतील, कुणीही बेघर होणार नाही, काहीही काळजी करण्याचे कारण नाही, असे यावेळी वाल्मिक अण्णा कराड यांनी म्हटले आहे. आजचे निवेदन देण्याच्या निमित्ताने वाल्मिक अण्णा कराड, ॲड.राजेश्वर आबा चव्हाण, बाजीराव भैय्या धर्माधिकारी, शकील भाई कुरेशी यांच्या सोबतीने हजारो परळीकर आज परळीच्या मध्यवर्ती प्रशासकीय इमारती मध्ये दाखल झाले होते. दरम्यान सदर राजपत्र रद्द करण्याबाबत वरिष्ठ वकिलामार्फत निर्धारित मुदतीच्या आत हरकत याचिका दाखल करण्यात येणार असल्याचेही वाल्मिक अण्णा कराड यांनी म्हटले आहे. यावेळी वाल्मिक अण्णा कराड, ॲड.राजेश्वर आबा चव्हाण, बाजीराव भैय्या धर्माधिकारी, शकील भाई कुरेशी, अय्युब भाई पठाण, अनंत इंगळे, रवी मुळे, अल्ताफ पठाण, जावेद कुरेशी, इस्माईल पटेल, अजीज कच्छी, शामसुंदर दासूद, केशव गायकवाड, महेंद्र रोडे, विजय भोयटे, शंकर आडेपवार यांसह असंख्य परळीकर उपस्थित होते.

----------

### आणखी दोन दिवस जोर कायम!

रेल्वे प्रशासन एकत्रितपणे काम करून मुंबईकरांना दिलासा देण्याचे काम करीत आहेत. मुंबईत रविवारी रात्रीपासून ते सोमवारी संध्याकाळ पर्यंत २६७ ते ३०० मिलीमीटर एवढ्या मोठ्या प्रमाणावर पाऊस झाला आहे. नागरिकांना मदतीसाठी सर्वोच्च प्राधान्य दिले जात असून, सर्व यंत्रणा २४ तास अलर्ट मोडवर असल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी येथे दिली. मुख्यमंत्री शिंदे यांनी परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी त्यांच्या समवेत मुंबई शहरचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, ग्रामविकास विभागाचे मंत्री गिरीष महाजन, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अतिरीक्त मुख्य सचिव डॉ.आय.एस.चहल, मुंबई महापालिका आयुक्त भुषण गगराणी उपस्थित होते.

----------

### अवैध उत्खनन व अनाधिकृत वाहतुकीवर

महसूल व पोलीस प्रशासनातील अधिकाऱ्यांची मुकसंमती असल्याचे दिसून येत आहे. सदर प्रकरणी नेमलेले पथकातील नावे तपासून पुनश्च नव्याने पथक नेमावे अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते अजय सरवदे यांनी केली आहे.

**जिल्हाधिकारी बीड यांनी २०२३ मध्ये नेमलेले पथक**

श्री.माधव काळे जिल्हा खनिकर्म अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय बीड हे पथक प्रमुख होते, श्री. इंद्रजित शेळके, अव्वल कारकून गृह विभाग, जि.का.बीड, श्री. राहुल पुरानिक अव्वल कारकून लेखा शाखा जि.का. बीड रोहयो विभाग जि.का.बीड, श्री. बाबासाहेब भंडारे अव्वल कारकून बीड, श्री. अंगद काशीद मंडळ अधिकरी पेंडगांव, श्री.तांबारे सुनिल साहेबराव, मंडळ अधिकारी होळ, दादा शेळके तलाठी तहसील कार्यालय बीड हे सहाय्यक म्हणून निवड केली होती.

**जिल्हाधिकारी बीड यांनी २०२४ मध्ये नेमलेले पथक**

श्री.अविनाश शिंगटे जिल्हा खनिकर्म अधिकारी पथक प्रमुख, श्री गणेश विघ्ने मोटार वाहन निरीक्षक उप प्रादेशीक परि. कार्या. बीड, पोलीस प्रतिनिधी पोलीस उपनिरीक्षक पोलीस अधिक्षक कार्यालय बीड, श्री पंडीत नाईकवाडे मंडळ अधिकारी, नेकनूर ता.बीड, श्री अंगद काशिद मंडळ अधिकारी, पेंडगांव , श्री. सुनिल तांबारे मंडळ अधिकारी होळ ता. केज, श्री. जगन्नाथ राऊत तलाठी, बलगुजार बीड तहसील कार्यालय केज, श्री. दादासाहेब शेळके तलाठी मांजरसुंबा ता. बीड हे सहायक म्हणून नेमले आहे.

----------

### बीडच्या तत्कालीन जिल्हाधिकारी

केले आहे. दिपाताई मुधोळ या बीडच्या जिल्हाधिकारी असताना त्यांनी अनेक उपक्रम हाती घेत जिल्ह्यात प्रशासनाला शिस्त लावण्याचे काम केले. तसेच वाळू माफिया, भुखंड माफिया यांच्यावर अंकुश मिळवला. त्यांच्या कार्यकाळात जिल्हयातील सामान्य नागरीक आपले प्रश्न घेऊन त्यांच्याकडे जात होते. मुधोळ या सुध्दा त्यांच्याकडे आलेल्या प्रत्येकाचे म्हणणे जाणून घेऊन संबंधितांना कार्यवाही करण्याचे आदेशित करीत होत्या. त्यामुळे त्यांच्याकडे आपली गाऱ्हाणे घेऊन येणाऱ्यांची संख्या वाढली होती. बीड लोकसभा निवडणुक त्यांनी निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून यशस्वीरित्या पार पाडली. काही दिवसापुर्वी त्यांची बीडच्या जिल्हाधिकारी पदावरुन बदली झाली होती. तर त्यांच्या जागी बीड जि.प. चे सीईओ अविनाश पाठक यांची बदली करण्यात आली. यावेळी मात्र मुधोळ यांना नियुक्ती देण्यात आली नव्हती. तर पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पदावर भाप्रसे आशिष येरेकर यांची अपर सचिव (सेवा) नितीन गद्रे यांनी बदली केली होती. यावेळी सामाजिक कार्यकर्ते परमेश्वर नाना येवले आणि पुणे येथील उद्योजक व दै. लोकतंत्रचे सहसंपादक गणेश मोकाशे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे येरेकर यांची बदली रद्द करुन त्यांच्या जागी दिपाताई मुधोळ यांची नियुक्ती करावी, यासाठी पाठपुरावा केला. त्यांच्या या प्रयत्नाला यश आले असून आशिष येरेकर यांची नियुक्ती रद्द करुन दिपाताई मुधोळ-मुंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुधोळ यांच्या सारखा चांगला अधिकारी महानगर परिवहन महामंडळाला मिळाल्यामुळे पुणेकरांनी समाधान व्यक्त केले असून कौतूकही केले आहे.

-------------------

### शरद पवार यांच्या गटाला निवडणूक

मान्यता मिळाली आहे. निवडणूक आयोगातील सुनावणीनंतर शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. आमच्या चार वेगवेगळ्या महत्त्वाच्या सुनावण्या दिल्लीत होत्या. शरद पवार यांचा पक्ष ज्याप्रकारे काढून घेण्यात आला, पण जनतेने आम्हाला आशीर्वाद दिले त्याबद्दल आभार. आम्हाला तुतारी हे चिन्ह तात्पुरत्या स्वरूपात देण्यात आले होते. पण आम्हाला चेक घेण्याचा अधिकार नव्हता. तसेच टॅक्स बॅनेफिट मिळत नव्हता. तर आता आमची विनंती मान्य करण्यात आली आहे अशी माहिती सुप्रिया सुळे यांनी दिली. दुसरी एक मागणी चिन्हातील कन्फ्युजनबद्दल होती. तुतारी वाजवणारा माणूस हे चिन्ह जिथे असेल तिथे दुसरे तुतारी हे चिन्ह नको आणि असा अन्याय इतर कोणत्याही पक्षावर होऊ नये ही विनंती केली आहे. आयोग म्हणाले त्यावर आम्ही अभ्यास करू. अशी प्रतिक्रिया सुप्रिया सुळे यांनी दिली.

----------

### लंडनहून येणारी ती वाघनखं

आता तर्कवितर्क सुरु झाले आहेत. इंद्रजीस सावंत यांनी विक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियमसोबत केलेल्या पत्रव्यवहारामध्ये म्युझियम प्रशासनाने वाघनखं अफजल खानाच्या वधावेळी वापरल्याबाबत अनिश्चितता असल्याचे म्हटले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी खानाच्या वधावेळी वापरलेल्या वाघनखांबाबत कोणताही पुरावा नाही. सदर वाघनखे १९७१ साली म्युझिअमकडे भेट म्हणून आली असेही पत्रात नमुद करण्यात आले आहे. भारतातील विविध ठिकाणांकडून एकूण ६ वाघनखं आली. ही वाघनखे ग्रँट डफ नावाच्या इंग्रज अधिकाऱ्याच्या परिवाराकडून भेट मिळाली होती. पण इंग्रज अधिकाऱ्याकडे ही वाघनखे कशी आली याची माहिती नाही. ती वाघनखे १८१८ सालच्या दरम्यान त्यांच्याकडे आली. इतिहासकार इंद्रजीत सावंतांच्या या दाव्यामुळे या प्रकरणात नवा ट्विस्ट आला आहे. याबाबत आता सरकार आणि सातारच्या राजघराण्यानेच पुढाकार घेऊन खुलासा करण्याची गरज आहे.

---------------

**बीड बायपासवर अपघात**

या झालेल्या विचित्र अपघातात, दोन ठार तर सुमारे दहा जण जखमी झाले आहेत. त्यांना तात्काळ जिल्हा रुग्णालय बीड येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. हा अपघात एवढा भीषण होता की, वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. अपघातातील काही जखमींची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात आले.

-----------


## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१८५/२०२४
कल्याण उत्तमराव कदम विरूध्द ग्रामपंचायत कार्यालय
पाटेगांव/मुगगांव ता.जि.बीड

पहा

१) कल्याण उत्तमराव कदम रा.पाटेगांव ता.जि.बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत-रंगनाथ हनुमंत कदम यांचा दिनांक १२/०२/१९०५ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालयास पाटेगांव/ मुगगांव-ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे पाटेगांव /मुगगांव ता.जि.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०८/०७/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख ०८/०८/२०२४ ही आहे.

**स्वाक्षरीत/-**
**तहसिलदार**

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार दि. ०९ जुलै २०२४



## मुख्यमंत्री 'वयोश्री योजने'चा पात्र लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील ६५ वर्षे व त्यावरील जेष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानपरत्वे येणारे दिव्यांगत्व,अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने, उपकरणे खरेदी करण्यासाठी तसेच मन स्वस्त केंद्र, योगोउपचार केंद्र इत्यादीद्वारे त्यांना मानसिक स्वास्थ्य आबाधित ठेवण्यासाठी राज्यात मुख्यमंत्री वयोश्री योजना राबविण्यात येणार आहे.

वयोश्री योजनेचे स्वरूप

सदर योजनेअंतर्गत पात्र वृद्ध लाभार्थ्यांना त्यांच्या शारीरिक असमर्थता, दुर्बलतेनुसार सहाय्यभूत साधने, उपकरणे खरेदी करता येतील उदाहरण चष्मा, श्रवण यंत्र, ट्रायपॉड, स्टीक,व्हील चेअर, फोल्डींग वाकर, कमोड खुर्ची, नि-ब्रेस,लंबर बेल्ट, सर्व्हाईकल कॉलर इत्यादी तसेच केंद्र शासनाच्या कार्मीक विभागाद्वारे नोंदणीकृत करण्यात आलेले तसेच राज्य शासनाद्वारे नोंदणी करण्यात आलेल्या योगोपचार केंद्र, मन स्वस्थ्य केंद्र, मनशक्ती केंद्र येथे सहभागी होता येईल.

योजनेसाठी निधी वितरण


राज्य शासनातर्फे शंभर टक्के अर्थसहाय उपलब्ध करून देण्यात येईल.

# आधुनिक काळात पारंपरिक पोतराजाची प्रथा उपेक्षितच

**ज्योतिराम पाढरपोटे । माजलगाव**

पूर्वी आषाढ महिन्यात ग्रामीण भागात ठिकठिकाणी आवर्जून दिसणाऱ्या पोतराजाच्या नशिबी सध्या उपेक्षिततेचे जगण आले आहे. मरिआई,कडकलक्ष्मी किंवा मरिबाई जेवढी कडक,उग्र असल्याचा समज आहे.तेवढाच तिचा भक्त पोतराजही कडक व उग्र वाटतो. लांब वाढलेले जटा झालेले केस, कपाळाला मळवट, कमरेला विविध रंगांच्या कापडांचे बनविलेले वस्त्र, त्यावर बांधलेली मोठ्या आकाराची घुंगरं,पायात चाळ आणि हातात आसूड असा त्याचा वेश असतो.त्याच्यासोबत असणारी बाई डोक्यावर मरिआईचा गाडा घेऊन हाताने ढोलके वाजवीत असते.ढोलक्याच्या एका बाजूने विशिष्ट प्रकारचा,सलग ध्वनी निर्माण करत दुसऱ्या बाजूला ठेका वाजवला जातो.तो वैशिष्ट्यपूर्ण ध्वनी मनात वेगळंच गूढ वातावरण तयार करतो.या तालावर नाचणारा पोतराज, पायातल्या घुंगरांनी वातावरण भारून टाकतो आणि हातातल्या आसुडाने स्वत:वर फटक्यांचा वर्षाव करून





मरिआईच्या कडक स्वभावाला साजेसा भक्तीचा आविष्कार दाखवत राहतो.

मरिआई ही मूळची दक्षिणेची;द्रविडांच्या ग्रामदेवींपैकी एक आहे.दक्षिणेत तिला मरिअम्मा या नावाने संबोधले जाते. महाराष्ट्रात तिचे मंदिर गाववेशीवर असते.पोतराज या मराठी शब्दाचा मूळ द्रविड शब्द पोतराजु असा आहे.पोत्तु म्हणजे रेडा किंवा बकरा.दक्षिणेत अशा प्राण्यांचा बळी देवीला प्रसन्न करण्यासाठी दिला जातो.असा बळी देण्याचे काम करणारा तो पोत्तराजु म्हणजेच मराठीत पोतराज होय.वर्षभरात एकदातरी ढोलक्याचा तालबद्ध आवाज,त्यावर वाजणारी घुंगरं आणि आसुडाचे कडाडणारे फटके कानावर पडतातच.हा थोडासा उग्र,भयावह वाटणारा गोंधळ कानी आला की,ग्रामीण व शहरी भागातील आयाबाया हातात धान्याचे सूप किंवा खण-नारळ घेऊन त्यांना देतात. मिळेल त्या धान्यावर कुटुंबाची गुजराण करणारा आणि आपल्या कलेवर प्रेम करणारा पोतराज आज आधुनिकतेच्या या समाजात उपेक्षित राहिला आहे.

पोतराज हा देवीची उपासना करणारा लोकसंस्कृतीचा उपासक आहे. कडकलक्ष्मी नावाची दारी येणारी भिक्षेकरीण 'दार उघड बया आता दार उघड' असे मरीआईला आवाहन करत भिक्षा मागते.या कडकलक्ष्मीला पोतराज असेही म्हणतात.

पोतराज जन्मपरंपरेने लहानापणापासून पायात घुंगरं बांधून डोक्यावर आईचे देऊळ घेतात. आयुष्यभर देवीच्या नावावर भटकंती करतात.स्थिर जीवन त्यांच्या वाट्याला येतचं नाही.आषाढ महिन्यापासून भटकंतीला सुरुवात होते.मरीआईचं देऊळ डोक्यावर घेऊन तो प्रथम देवीच्या समोर दाखल होतो. देवीच्यासमोर त्याच्या डोक्यावरचे देऊळ टेकवतो. त्याच्याबरोबर असलेली स्त्री ढोलकं वाजवयाला सुरू करते.आवाजाने सर्व बाल-गोपाळ मंडळी त्यांच्याभोवती गराडा घालतात आणि पोतराज धुपात्री म्हणतो.धुपात्रीला ढोलक्याची साथ असते.

पोतराजाच्या अंगात देवी आली म्हणून देवीला कोडे किंवा प्रश्न विचारला जातो. देवी पोतराजाच्या तोंडून उत्तर देते असे लोक मानतात. त्यानंतर पोतराजाची पूजा करून त्याला पैसे व सुपातून धान्य दिले जाते.पोतराज हा एक प्रकारे अशी आपली लोककला सादर करून त्यावर उपजीविका करत असतो.एकविसाव्या शतकात एकीकडे मंगळावर मानवी वस्ती करण्याची स्वप्न उघड्या डोळ्याने पाहणारे आम्ही, आमच्या या पारंपारिक लोककलावंतांकडे मात्र जाणीवपूर्वक डोळेझाक करत आहोत असेच म्हणावे लागेल.

### पोतराज लुप्त होत चाललेली लोककला..

पूर्वीच्या बारा बलुतेदार ग्रामीण संस्कृतीत लोककलावंतांना मोठा मान होता;मात्र सध्याच्या 'सोशल मिडीयाच्या' जगात आपल्या विविध लोककला लोप पावत चालल्या आहेत.जसे पहाटेच्या प्रहरी हरीनाम गुणगुणत वासुदेवाची स्वारी अवतरते.वासुदेवाच्या वाणीने प्रत्येकाची सकाळ प्रसन्न होवून जाते.त्याप्रमाणे पोतराज हा सुद्धा हा या लोककलावंतांपैकी एक हे पोतराज मरिआईचे उपासक असतात.हे आपली कला सादर करून बक्षिसी मागतात.

### पोटाची खळगी भरणार तरी कशी?

ग्रामीण भागातील लोकांच्या श्रद्धेला आधार देणारा हा पोतराज आता विरळ होत चालला आहे. श्रद्धेच्या नावावर पोटासाठी चाबकाचे फटके अंगावर म रून घेतो,कोणताही सण असो पोटाची खळगी भरण्यासाठी दिवसभर उन्हात घरोघरी फिरणारा पारंपरिक पोतराजाचे कुटुंबीय आजच्या आधुनिकतेच्या युगात पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत आहेत.

## एक राज्य एक गणवेश योजनेचा धारूर तालुक्यात बोजवारा; शिक्षण अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

### शाळा सुरु होऊन एक महिना संपत आला तरी विद्यार्थ्यांना गणवेश मिळेना

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

१५ जून २०२४ पासून एक राज्य एक गणवेश योजना शासनाने लागू केली पहिले ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना मोफत गणवेश मिळणार आहेत. यामध्ये विद्यार्थ्यांनी ना गडद निळ्या रंगाचा ओढणी व आकाशी रंगाचा पंजाबी तर मुलांना शर्ट, पॅन्ट शासनाकडून मोफत मिळणारा आहेत.शाळा सुरू होऊन एक महिना होत आला तरी मुलांना गणवेश मिळेनात.शिक्षण विभागाचे योग्य नियोजन नसल्याने विद्यार्थ्यांना गणवेश कधी मिळणार असा प्रश्न निर्माण झाला आहे.



धारूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळातील विद्यार्थ्यांना शासनाकडून मिळणारा मोफत गणवेश शाळा सुरू होऊन एक महिना झाला तरी अद्याप गणवेश मिळालेच नाहीत. शिक्षण विभागाचा भोंगळ कारभार पाहायला दिसत आहे योग्य नियोजनाचा अभाव .धारूर तालुका हा ऊसतोड मजुरांचा तालुका म्हणून ओळखला जातो या तालुक्यामध्ये ग्रामीण भागात जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी हे सर्वसामान्य कुटुंबातील व ऊसतोड मजुरांचे पाल्ये आहेत जिल्हा परिषद शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी व शाळा टिकवण्यासाठी शासनाकडून विविध उपक्रम राबवले जातात यामध्ये जिल्हा परिषदेतील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके शाळेचा गणवेश व मध्यांना भोजन सारख्या योजना राबवल्या जातात. शाळा सुरू होऊन एक महिना संपत आला तरी तालुका शीक्षण विभागाकडून जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेशच मिळाले नाहीत विद्यार्थ्यांना लवकरात लवकर गणवेश वाटप करण्यात यावे अशी मागणी पालकांमधून केली जात आहे.

शिक्षण विभागात सावळा गोंधळ शिक्षण अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

शाळा सुरू होऊन एक महिना संपत आला तोच शिक्षण विभागातील सावळा गोंधळ समोर येत आहे. गांजपूर येथील पालकांनी शिक्षक मिळत नसल्यामुळे शिक्षणाधिकारी कार्यालयाच्या आवारातच शाळा भरवल्याचा प्रकार घडला होता. हिंगणी बुद्रुक जिल्हा परिषद शाळेतील रिक्त जागा भरण्यासाठी गावकरी आक्रमक झाल्याचे दिसले होते. काही अनुदानित शाळा अनधिकृत फीस घेत असल्याचे प्रकार घडले आहेत. इंग्रजी माध्यमांच्या शाळा चा मनमानी कारभार सुरू आहे. शासकीय वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे भोजन मिळत असल्याचे तक्रारी आहेत.

## वसंतदादा पाटील महाविद्यालयात रासेयोमार्फत वृक्षारोपण संपन्न

**पाटोदा । प्रतिनिधी**

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ८ जुलै रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत महाराष्ट्र शासन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या रासेयो विभागाच्या निर्देशानुसार महावृक्ष लागवड मोहिमेअंतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, पदव्युत्तर विभाग संचालक डॉ. गणेश पाचकोरे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड यांच्यासह



प्राध्यापक व रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी प्रत्येकी तीन वृक्षांची लागवड महाविद्यालय परिसरात केली. या मोहिमेत १० स्वयंसेवकांनी उस्फूर्तपणे सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सूर्यकांत देशमुख, प्रा. मनिषा गाढवे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## जानपीर विद्यालयातील सावित्रीच्या लेकी करणार रास्ता रोको

**पाटोदा । प्रतिनिधी**

आगाराच्या गलथान कारभाराच्या विरोधामध्ये नाळवंडी डोंगरकिन्ही कारेगाव भाटेवाडी व परिसरातील विद्यार्थिनी करणार दिनांक ०९/०७/ २०२४रोजी सकाळी १०.३०वाजता बीड नगर रोडवरील नाळवंडी फाटा येथे शिक्षणाच्या बट्ट्याबोळामुळे करणार रस्ता रोको आंदोलन. आज शासन मुलींच्या शिक्षणासाठी कोट्यावधी रुपये खर्च करत आहे .

नाळवंडी येथील जानपीर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नाळवंडी /कारेगाव या विद्यालयांमध्ये या परिसरातून इयत्ता पाचवी ते बारावी पर्यंतचे विद्यार्थी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसने गेल्या चार ते पाच वर्षापासून नियमितपणे प्रवास करून शाळेत येतात गेल्या वर्षी पाटोदा आगारातील अधिकारी जानपीर विद्यालयाचे मुख्याध्यापक बालाघाट विद्यालय जाटनांदुरचे मुख्याध्यापक तसेच संत भगवानबाबा विद्यालय सांगळवाडी चे मुख्याध्यापक यांची समोपचाराने नाळवंडी येथे बैठक घेऊन एसटीचे नियोजन करण्यात आले होते त्या नियोजनानुसार गेल्या गेल्या वर्षी पर्यंत बस सुरळीत चालू होती त्यामध्ये कोणाची अडचण नव्हती परंतु यावर्षी जून पासून शाळा सुटल्यानंतर ३.३० वाजता जाणारी डोंगरकिन्ही भाटेवाडी येथील बस फेरी अचानक बंद केली त्यामुळे डोंगरकिन्ही व भाटेवाडी या ठिकाणच्या ४० मुली यांचे पास आहेत या विद्यार्थिनींचे शैक्षणिक नुकसान होत आहे या चुकीच्या नियोजनामुळे विद्यार्थिनींचे व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे बस वेळेवर येत नाही त्यामुळे अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत आहेत यामुळे या परिसरातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान हे पाटोदा आगारातील नियोजनामुळे होत आहे वारंवार या आगाराला विनंती अर्ज करूनही बसचे नियोजन व्यवस्थित न केल्यामुळे नाविलाजाने आगार व्यवस्थापनाच्या विरोधामध्ये नाळवंडी डोंगरकिन्ही कारेगाव भाटेवाडी जन्नेवाडी कठाळवाडी या गावातील विद्यार्थिनी व विद्यार्थी तसेच गावातील सरपंच ग्रामपंचायत सदस्य व गावकरी हे रास्ता रोको करणार आहेत. जोपर्यंत एसटी वेळेवर सुरू होत नाही तोपर्यंत आम्ही रस्त्यावरून उठणार नाही असा निर्धार या परिसरातील सावित्रीच्या लेकी व विद्यार्थी पालक यांनी केलेला आहे याची गांभीर्यपूर्वक नोंद घ्यावी.

## वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड.अहंकारे यांची निवड

**किल्लेधारुर । प्रतीनिधी**

धारूर शहरातील वकील संघाच्या वार्षिक कार्य करणीसाठी निवडणूक प्रक्रिया पार पडली या मध्ये अध्यक्षपदी ॲड. एम एस अहंकारे निवड झाली. धारूर येथील वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड.एम.एस.अहंकारे यांची तर सचीवपदी ॲड. आर. व्ही.अवस्थी यांची सोमवारी



निवड झाली. संघटनेचे अन्य पदाधीकारी पुढील प्रमाणे उपाध्यक्ष ॲड.पी.एच.ठोंबरे ,कोषाधक्ष ॲड.आर. एस. सावंत, ग्रंथपाल ॲड.बी.डी.नखाते यांची निवड झाली.यावेळी निवडणुक निर्णय अधीकारी म्हणुन ॲड.के.जी.शुक्ला यांनी काम पाहीले.

## माणसात संवेदनशीलता जागृत असणे गरजेचे-अंबादासराव जोशी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

माणसातील संवेदना नष्ट होऊ लागल्याने एकमेकाशी चांगली वागणूक राहिली नाही, त्यासाठी प्रत्येकातील संवेदनशीलता जागृत होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन गोव्याचे लोकायुक्त अंबादासराव जोशी यांनी येथे केले. येथील संत गाडगेबाबा सेवाभावी संस्थांतर्गत आधार माणुसकीच्या उपक्रमांतील ७०० विद्यार्थ्यांना रविवारी येथे स्कूल किट वाटप करण्यात आल्या. माईर्स एमआयटीच्या प्रांगणात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजसेवक तुळशीराम कराड हे होते. छत्रपती संभाजीनगर येथील महात्मा गांधी मिशनचे अध्यक्ष डॉ. पांडूरंग जाधव, अखिल भारतीय इतिहास संकलन समितीचे अध्यक्ष प्रा. डॉ. शरद हेबाळकर, लातूरचे श्वसन व छाती विकार तज्ज्ञ डॉ. रमेश भराटे, लातूर येथील पत्रकार विनोद चव्हाण, डॉ. सोनाली अनिल मस्के, दिपाताई बबन लोमटे, पुणे येथील मराठवाडा मित्र मंडळाच्या महाविद्यालयाचे प्रा. ओमप्रकाश आजबे, अथर्व डेव्हलपर्सचे बालासाहेब कदम, प्रा. संदिपान मोरे, रामकृष्ण पवार, एमआयटीच्या स्कूल डिव्हिजनचे संचालक संगप्पा बनदवार, ॲड. एन. बी. केंद्रे, दास महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती. उपक्रमाचे प्रमुख ॲड. संतोष पवार यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

श्री. जोशी मुलांना व त्यांच्या पालकांना उद्देशुन आपल्या मुलांवर संस्कार करण्याची जबाबदारी पालकांची आहे. हे न विसरता प्रत्येक घरात वाचन संस्कृती रुजली पाहिजे, पालकात आणि मुलांमध्ये संवाद झाला पाहिजे, शेतकऱ्यांनी जुन्या पध्दतीप्रमाणे आपले, बियाणे आपणच तयार करावे असे आवाहन अंबादासराव जोशी यांनी केले.

कष्टाची तयारी ठेवा - जाधव

परिस्थिती कशीही असो, तुमची कष्ट व मेहनत करण्याची तयारी



असेल तर कुठलाही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू शकत नाही. सध्या वैद्यकीय प्रवेशासाठी असणाऱ्या नीट परीक्षेतील उघडकीस आलेला घोळ सुरू आहे. हा विषय तर आता संशोधनाचा बनला आहे. मुलांनी व्यसनापासून दूर राहून अभ्यासाची तयारी ठेवली पाहिजे अशी अपेक्षा प्रा. डॉ. पांडूरंग जाधव यांनी व्यक्त केली.

प्रा. हेबाळकर म्हणाले, संतांची शिकवण व संस्कार अंगीकारले तर सुखी व आनंदी जीवनाची परिभाषा कळेल असे सांगून समाजात अशा मदतीच्या कार्यक्रमाची गरज पडू नये यासाठी प्रयत्न होण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. डॉ. रमेश भराटे यांनी आधार माणुसकीच्या उपक्रमातील आत्महत्याग्रस्त शेतकरी, कोरोनाग्रस्त व एचआयव्ही बाधित कुटूंबातील सदस्यांना वैद्यकीय उपचाराची गरज पडली तर त्यांच्यासाठी आपण स्वत:च्या रुग्णालयात मोफत उपचार करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

स्कूल किट

यावेळी उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात १५ विद्यार्थ्यांना वर्षभर पुरेल एवढ्या शैक्षणिक साहित्याची स्कूल किट देण्यात आली. कार्यक्रमानंतर सर्व ६८५ मुले व मुलींना हे साहित्य वाटप झाला. या कार्यक्रमात या उपक्रमांतर्गत वैद्यकीय, अभियांत्रिकी, आयआयटी यासह इतर उच्च शिक्षण घेत असलेल्या ८५ विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना भाट वस्तू देण्यात आल्या. दहावी व बारावीच्या गुणवंतांचाही सत्कार झाला.

उपस्थितांचे स्वागत मीरा बरकते यांनी सादर केलेल्या स्वागत गीताने झाले. सुभाष शेप, आसाराम जोशी व मयुरी मजगे यांनी उपस्थितांचे विविध गीतांनी मनोरंजन केले. प्रास्ताविक उपक्रमाचे प्रमुख ॲड. संतोष पवार यांनी केले. सूत्रसंचालन शिवानंद गुळवे यांनी केले. प्रशांत बर्दापूरकर यांनी आभार मानले.

सर नको दादा म्हणा

मी तुम्हाला मदत करतो म्हणजे खुप काही नाही, समाजसेवेचे वृत घेतल्याने ते माझे कर्तव्य आहे. या मदतीमध्ये अनेक दानशूरांचे हात लागलेले आहेत. त्याचे सार्थक मुलांनी करावे, आणि मी तुमचा सर्वाचा भाऊ आहे. त्यामुळे मला 'सर' नव्हे 'दादा' म्हणा अशी अपेक्षा ॲड. संतोष पवार यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमात एमआयटीस्कूल डिव्हिजनचे मुख्याध्यापक रामराजे कराड, उपमुख्याध्यापक श्री. बोंदर यांच्यासह कर्मचारी यांनी सहकार्य केले. आधार माणुसकीच्या उपक्रमांतील ५० स्वयंसेवकांनी सामाजीक भावना जपत सतत तिन दिवस मदत करून पुढाकार घेतला.

पान ६ वरून...

### मुख्यमंत्री - 'माझी लाडकी बहीण'

योजनेला मुदतवाढ देताना उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी योजनेच्या पात्रतेच्या निकषांमध्ये बदल केला आहे. आता लाभार्थी महिलेकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर त्याऐवजी पंधरा वर्षांपूर्वीचे रेशनकार्ड, मतदार ओळखपत्र, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा जन्म प्रमाणपत्र यांपैकी कोणतेही प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार आहे. योजनेतून शेतकरी बांधवांसाठी पाच एकर शेतीची अट वगळण्यात आली आहे. योजनेत लाभार्थी महिलेचा वयोगट २१ ते ६५ वर्षे असा करण्यात आला आहे. त्याचबरोबर अडीच लाख रुपये उत्पन्नाचा दाखला उपलब्ध नसेल आणि ज्या कुटूंबाकडे पिवळे किंवा केशरी रेशन कार्ड उपलब्ध असेल त्यांना उत्पन्नाच्या दाखला प्रमाणपत्रातून सुट देण्यात आली आहे. त्यासोबतच योजनेत कुटूंबातील एका पात्र अविवाहीत महिलेला सुध्दा योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी केलेल्या घोषणेनुसार दुर्बल घटकातील अधिकाधिक पात्र महिलांनी या योजनेचा लाभ घेवून महायुती शासनाने दिलेल्या १५०० रुपये मासिक अर्थसहाय्याचा फायदा घेण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी केले आहे.

### भयमुक्त परळीसाठी विधानसभा

जनतेच्या डोळ्याला दिसेल असा विकास करून दाखवायचं आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत आपण महाविकास आघाडीच्या वतीने निवडणूक लढवण्याचा आपला ठाम निर्धार असल्याचे त्यांनी सांगितले.

ज्या गावच्या बोरी त्याच गावच्या बाभळी

परळी विधानसभा मतदारसंघातील गुंडागर्दी, दहशत संपवून लोकांना भयमुक्त करण्यासाठी, कशाचीही पर्वा न करता मी परळी विधानसभा निवडून लढणार असुन मतदारसंघातील जनतेच्या लोकभावनेचा आदर करून निवडणूक लढणार आहे. ज्या गावच्या बोरी त्याच गावच्या त्याच गावच्या बाभळी असतात. असेही राजेभाऊ फड म्हणाले.

### सरकारने शेतकरी कर्जमाफी करावी

समितीचे माजी सभापती ज्ञानेश्वर कोकाटे, विधानसभा अध्यक्ष सुभाष जाधव, प्रा संदीप नवले, कैलास शेजाळ, शेख रहीम, शेख बशीर, करपे बाबासाहेब, विक्रम सावंत, ठोकळ बाबासाहेब आदी शेतकऱ्यांच्या वतीने निवेदन देण्यात आले.

### तहसीलदारांच्या विनंतीस

सेनेचे धाराशिव तालुका अध्यक्ष सुखदेव देवकर, देगलूर तालुका युवा यशवंत सेनेचे विलास सरमाळे कॉग्रेसचे यांच्यासह वडार व धनगर समाजासह विविध संघटनेचे नेते, पदाधिकारी कार्यकर्ते सर्व सामान्य धनगर व वडार समाज बांधव उपोषण स्थळी भेट देत आहेत.

पण आमरण उपोषणाचा आज दहावा दिवस उलटल्या नंतर तरी शासकीय यंत्रणेला जाग आली व आज पुन्हा प्रभारी तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी व नायब तहसीलदार सुहास हजारे यांनी उपोषण स्थळी भेट दिली व उपोषण सोडण्यास विनंती केली पण उपोषणकर्ते भाई आकाश निर्मळ यांनी दुसऱ्यांदा आमरण उपोषण मागे घेण्यास नकार दिला जोपर्यंत धनगर आणि वडार समाजाला एस्? टी प्रवर्गाची आरक्षणाची अंमलबजावणी होत नाही तोपर्यंत उपोषण सोडणार नाही असे भाई आकाश निर्मळ यांनी प्रशासनाला ठणकावून सांगितले

लोकप्रतिनिधी, आरोग्य विभागासह पोलिसांनीचेही दुर्लक्षच!

गेल्या दहा दिवसांपासून धनगर व वडार समाजाच्या एसटी आरक्षण अंमलबजावणीसाठी भाई आकाश निर्मळ हे उपोषणाला बसलेले असून त्यांच्याकडे बीड जिल्ह्यातील कुठलाही आमदार व खासदार बरोबर आरोग्य यंत्रणा व पोलीस सुरक्षा यांनीही येवून साधी चौकशीही केली नाही. तशी त्यांना करावीशी वाटलेली नाही. यावरून तर स्पष्ट दिसून येते कि बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील कुठल्याच लोकप्रतिनिधींना धनगर व वडार समाजाचे बांधवांचे कसलेच देणे घेणे नाही.

cmyk




# कसं असेल राज्यातील हवामान? कुठं कुठं पडणार पाऊस?

## हवामान विभागाचा आजचा अंदाज

राज्यातील काही भागात जोरदार पाऊस कोसळत आहे. तर काही भागात अद्यापही पावसाची प्रतीक्षा कायम आहे. ज्या भागात चांगला पाऊस झालाय, त्या भागात शेतीच्या () कामांना वेग आला असल्याचं पाहायला मिळत आहे. दरम्यान, आज राज्यातील हवामान नेमकं कसं असेल, याबाबतची माहिती हवामान विभागानं () दिली आहे. जाणून घेऊयात हवामान विभागाचा अंदाज. हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार, आजही राज्याच्या विविध भागात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. राज्यातील बहुतांश भागात आज पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. कोकणसह मध्य महाराष्ट्र विदर्भ आणि मराठवाड्यात आज पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यामुळं या भागात आज मुसळधार पावसाची शक्यता आहे. त्यामुळं नागरिकांनी योग्य ती खबरदारी घ्यावी, असं आवाहन प्रशासनाच्या वतीनं करण्यात आलं आहे.

सांगली : जिल्ह्यात जोरदार पावसाला सुरुवात चांदोली धरणाच्या पाणीसाठ्यात वाढ शिराळा तालुक्यातील चांदोली धरण पाणलोट क्षेत्रात पुन्हा पावसाने दमदार हजेरी लावली आहे. दमदार पावसाने सुरुवात केल्याने बळीराजा सुखावला असून



चांदोली परिसरामध्ये चिक्कलगुट्टा भात रोप लागलीस सुरुवात झाली आहे. तर दुसरीकडे चांदोली परिसरामध्ये अतिवृष्टी व दमदार पावसाने या परिसरातील सर्व धबधबे प्रवाहित झाले असून ते पर्यटकांच्यासाठी साद घालत आहेत. चांदोली धरणात एकूण १४.५२ टीएमसी तर ७.६४ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा झाला आहे. पाऊस सुरु झाल्यापासून पाणीसाठ्यात ४.२२ टीएमसीने वाढ झाली आहे. या चालू वर्षी आतापर्यंत ९४१ मिलिमीटर पाऊस पडला असून १६०३८ ने पाणी क्यूसेक्कने धरणांमध्ये येत आहे तर नदीपात्रात ६७५ मिलिमीटर पाणी नदीपात्रात सोडले जात आहे. आत्तापर्यंत १५.८५ टीएमसी म्हणजे ४६.८ टक्के धरण भरले आहे.

मालेगाव तालुक्यातील पिके धोक्यात, पाऊस नसल्यानं शेतकरी चिंतेत

गेल्या महिन्याभरात नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यात एकदाच पावसाने हजेरी लावली आहे. त्या पावसावर शेतकऱ्यांनी पेरण्या देखील केल्या आहेत. मात्र, पावसाने पाठ फिरवली अन्? शेती पिके संकटात सापडली आहे. पिके करपू लागल्याने पिकांना वाचवण्यासाठी आता शेतकऱ्यांची धडपड सुरू आहे. विहिरीत असलेल्या पाण्याचा उपयोग करुन घेत मालेगाव तालुक्यातील शेतकरी ठिबक व तुषार सिंचनाचा वापर करत आहेत. किमान पाऊस पडेपर्यंत या पाण्यावर तरी पिके जगतील अशी आशा शेतकऱ्यांना आहे. सध्या मालेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठ्या पावसाच्या पाण्याची गरज आहे.

# युरिया 'रेक'ची माहिती देण्याचे कंपन्यांवर बंधन

पुणे : रेल्वे वाघिणीतून (रेक) आलेल्या युरियाचे वाटप कोणत्या भागात, कसे होणार आहे, याची आगाऊ माहिती कृषी विभागाला पाठविण्याची सक्ती खत कंपन्यांना करण्यात आली आहे. कृषी आयुक्तालयाच्या निविष्ठा व गुणनियंत्रण विभागाचे संचालक विकास पाटील यांनी युरिया वितरणाबाबत राज्यस्तरीय नियोजन केले आहे.

कोणत्या कंपनीकडून खताचा रेक कोणत्या मालधक्क्यावर कधी पाठविला जाणार आहे, मालधक्क्यावरील खताची वाहतूक कोण करणार, कोणत्या गावाला किती प्रमाणात खत पाठवले जाणार, याची माहिती पुरविण्याचे बंधन कंपन्यांवर टाकण्यात आले आहे. त्यामुळे हेतुतः टंचाई करणाऱ्यांवर नजर ठेवली जाते. तसेच, युरियाचा काळाबाजार नियंत्रणात येत आहे, असा दावा गुणनियंत्रण विभागाने केला आहे. कृषी विभागाने खताच्या वितरणासाठी यंदा तालुकानिहाय नियोजन करण्याच्या सूचना प्रत्येक जिल्ह्याला दिल्या आहेत. गेल्या तीन वर्षांतील प्रत्येक तालुक्यात ग्रेडनिहाय असलेली खतांची विक्री व यंदाचा अंदाज असे दोन्ही मुद्दे घेत प्रत्येक तालुक्याला किती खत लागेल, याचे नियोजन करण्यात आले आहे. तालुकानिहाय खतवितरणाचे नियोजन न केल्यामुळेच शेतकरी व लोकप्रतिनिधींकडून तक्रारी येतात. त्यामुळे रेल्वे रेकने आलेली खते फक्त जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी किंवा मालधक्क्याच्या आसपास असलेल्या तालुक्यांमध्येच वितरित केली जाणार नाहीत, याकडे लक्ष द्यावे, अशा सूचना कृषी आयुक्तालयाने दिल्या आहेत. राज्याच्या अनेक भागात खत विक्रेत्यांकडून खते विकताना शेतकऱ्यांची पार्श्वभूमी तपासली जात असल्याचे आढळून आले आहे. शेतकरी जर या विक्रेत्याकडून बियाणे किंवा कीटकनाशके खरेदी करीत नसल्यास त्याला खत देण्यास नकार दिला जातो. हा प्रकार लिंकिंग श्रेणीत मोडणारा असून अशा विक्रेत्याच्या विरोधात कडक कारवाईच्या सूचना देण्यात आल्या आहेत.




# फळमाशी नियंत्रणाची संपूर्ण माहिती

फळमाशी ही सध्याला भारतामध्ये नव्हे तर संपूर्ण जगामध्ये एक प्रमुख कीड झाली आहे. संपूर्ण जगामध्ये फळमाशीच्या ४५०० हून अधिक प्रजाती आढळतात. भारतामध्ये सुमारे २०० हून अधिक जाती आहेत. आणि त्यातील ५ ते ६ प्रजाती या थेट पिकाला नुकसान पोहचवत असतात. जर आपण वेळीच या फळमाशीचे नियंत्रण नाही केले तर जवळ-जवळ २० ते ३० %पिकाचे नुकसान होऊ शकते.

फळमाशी कोणत्या पिकावर येते? : फळमाशी चा प्रादुर्भाव हा पेरू, आंबा, चिकू, द्राक्ष, अंजीर, डाळिंब, बोर, लिंबूवर्गीय फळे अशा फळांवर तर कलिंगड, दोडकी, काकडी, भोपळा, घोसाळी, तोंडली, कारली, पडवळ इ. वेलवर्गीय फळभाज्यावर होऊ शकतो.

फळमाशीचा जीवनक्रम : फळमाशी ही आकारणे लहान असते. तिची लांबी ही ७ मिमी इतकी असते. आपल्या घर माशी एवढीच ही देखील माशी असते. फळमाशीच्या एकूण ४ अवस्था असतात अंडी, अळी, कोष आणि माशी. फळमाशी ची मादी सुरुवातीला फळामध्ये अंडी घालते. एका छिद्रामध्ये १ ते १५ अंडी असू शकतात. फळमाशी तिच्या पूर्ण जीवनक्रमामध्ये ५०० ते १५०० अंडी घालते. ही अंडी पांढऱ्या रंगाची आणि १ मिमी लांबीची असतात. ही अंडी १ आठवड्यात



उबतात. आणि त्यामधून पिवळ्या रंगाच्या आळ्या बाहेर पडतात. या आळ्या पूर्ण वाढीसाठी १ ते ३ आठवडे घेतात. पूर्ण वाढ झालेल्या आळ्या फळातून बाहेर येऊन जमिनीमध्ये ५ ते १५ सेंटीमीटर खोलीवर जाऊन कोश अवस्थेमध्ये जातात. कोश अवस्था ही १ आठवडा ते ४० दिवसांची असू शकते. पूर्ण वाढ झालेल्या कोशामधून माशा बाहेर पडतात व त्या पुन्हा फळामध्ये अंडी घालतात. ही माशी पुढे जाऊन ३ ते ४ महीने जगते. अशा प्रकारे एका वर्षामध्ये फळमाशीच्या ९ ते १० पिढ्या पूर्ण होतात.

भारतामध्ये प्रामुख्याने आढळणाऱ्या फळमाशा : फळमाशी पिके, बॅक्ट्रोसेरा डॉरसॅलिस, बॅक्ट्रोसेरा झोनाटा, बॅक्ट्रोसेरा करेक्टा, बॅक्ट्रोसेरा कुकुरबीटी.

फळमाशी मुळे होणारे नुकसान : फळमाशी च्या आळ्या फळामधील गर खातात व परिणामी फळाची गुणवत्ता खालावते. फळे पिवळी पडतात व पुढे जाणून ती सुकून खाली पडतात. फळमाशी ने फळावर केलेल्या छिद्रामुळे फळामध्ये इतर बुरशीचा शिरकाव होतो व अशी फळे सडू लागतात. फळे वेडी वाकडी होतात. फळांची वाढ खुंटते.

फळमाशी नियंत्रणसाठी उपाययोजना : उन्हाळ्यामध्ये जमीन चांगली नांगरून घ्यावी व जमीन उन्हामध्ये टापू द्यावी. असे केल्यामुळे मातीमधील फळमाशीच्या सुप्त अवस्था नष्ट होतात. बागेतील कीड ग्रस्त सर्व फळे गोळा करून नष्ट करावीत. फळमाशी चा प्रादुर्भाव हा पक्क फळावर जास्त होतो. त्यामुळे फळे पिकण्यापूर्वी त्यांची काढणी करावी. फळमाशीचे नर कंट्रोल करण्यासाठी कामगंध सापळ्यांचा वापर करावा.


# मार्केट मधील टॉप ५ दोडका बियाणे

शेतकऱ्यांनी दोडक्याची शास्त्रोक्त पद्धतीने लागवड केल्यास त्यांना या पिकापासून चांगले उत्पादन घेता येते. दोडक्यामध्ये व्हिटॅमिन सी, लोह, मॅग्नेशियम, थायामिन, रिबोफ्लेविन आणि जस्त भरपूर प्रमाणात असते. याशिवाय या मध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते. शेतकऱ्यांनी दोडक्याच्या सुधारित वाणांची पेरणी केल्यास शेतकऱ्यांना यातून चांगला नफा मिळू शकतो.

दोडक्याच्या काही निवडक जाती :

१. पुसा नसदार – दोडक्याची ही एक सुधारित जात आहे. या जातीचे दोडके हे हलके हिरवे असतात. या जातीच्या दोडक्याच्या सालीवर फुगलेल्या नसा सारखा आकार असतो. या जातीचा आतील भाग पांढरा आणि हिरव्या रंगाचा असतो. तसेच या जातींचे दोडके हे १२-२० सें.मी. लांब असते. दोडक्याच्या या जातीचे उत्पादन हे चांगले लक्षणीय आहे. या जातीपासून ७०-८० क्विंटल प्रति एकरपर्यंत उत्पादन मिळू शकते.

२. सरपुटिया – दोडक्याची ही देखील एक सुधारित वाण आहे. या जातीची दोडके वेलीवर गुच्छांमध्ये लागतात. या जातीच्या दोडक्याचा लांबी हि इतर जातीपेक्षा लहान असते. या जातीच्या दोडक्यावर उंच पट्टे आढळतात. या जातीच्या दोडक्याची साल हि इतर जातीच्या दोडक्यापेक्षा अधिक जाड आणि मजबूत असते. दोडक्याची या जातीची लागवड जास्त करून मैदानी भागात आपल्याला अधिक पहावयास मिळेल.



३. पीकेएम १ – दोडक्याच्या सुधारित जातीपैकी एक जात म्हणजे पीकेएम १ ही एक जात. या जातीची दोडके हे चवीला चांगले चविष्ट असल्याचे सांगितले जाते. या जातीचे दोडके हे दिसायला खुपच सुंदर असतात हे प्रामुख्याने गडद हिरव्या रंगाचे असतात. दोडक्याच्या या जातीपासून २८०-३०० क्विंटल प्रति हेक्टर पर्यंत उत्पादन मिळू शकते. दोडक्याची ही जात १६० दिवसात काढणीसाठी तयार होते. या जातींचे दोडके हे पातळ, लांब, पट्टेदार आणि दिसायला किंचित वाकलेले असतात.

४. घिया – दोडक्याची ही एक सुधारित जात आहे. या जातीचे दोडके हे चांगले हिरवे असतात. दोडक्याच्या या जातीची भारतात मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते, आणि या जातीची लागवड करून शेतकरी चांगली कमाई देखील करत आहेत. शेतकरी मित्रांनो या जातीच्या दोडक्याची साल हि पातळ असते. दोडक्याच्या या जातीमध्ये जीवनसत्वाचे प्रमाण चांगले मोठ्या प्रमाणात असते त्यामुळे याचे सेवन आरोग्यासाठी चांगले सांगितले जाते.

५. काशी दिव्या – दोडक्याच्या या जातीचे वेल ४.५ मीटर उंच असून फळे दंडगोलाकार असतात रंग हलका हिरवा असून लांबी २० ते २५ सें.मी. पेरणीनंतर ५० दिवसांनी पीक तयार होते. त्याची उत्पादन क्षमता १३०-१६० क्विंटल प्रति हेक्टर आहे.

६. नागा दोडका – दोडक्याच्या या जातीचा रंग हिरवा आणि लांबी २०-२५ सें.मी. पेरणीनंतर ५०-५५ दिवसांनी पीक काढण्यासाठी तयार होते. त्याची उत्पादन क्षमता देखील चांगली आहे. दोडक्याचे प्रति हेक्टरी २००-२२० क्विंटल उत्पादन मिळते.ओळीतील अंतर : ६-८ फूट; दोन रोपांमधील अंतर : ३ फूट ठेवावे.

७. पुसा स्नेहा – दोडक्याच्या या जातीचा रंग गडद हिरवा आणि लांबी २०-२५ सें.मी. पेरणीनंतर ५०-५५ दिवसांनी पीक काढण्यासाठी तयार होते. त्याची उत्पादन क्षमता देखील चांगली आहे. दोडक्याचे प्रति हेक्टरी २००-२३० क्विंटल उत्पादन मिळते.

८. स्वर्णप्रभा – या जातीला तयार होण्यास थोडा जास्त वेळ लागतो, परंतु उत्पादन चांगले मिळते. पेरणीनंतर ७०-७५ दिवसांनी पीक काढणी योग्य होते. प्रति हेक्टर उत्पादन क्षमता २००-२५० क्विंटल आहे.

९. कल्याणपूर ग्रीन स्मूदी – दोडकाच्या या जातीची फळे मध्यम आकाराची आणि मांसल असतात. फळांवर हलके पट्टे तयार होतात आणि दोडक्याच्या या जातीची उत्पादन क्षमता खूप जास्त असते. लुफा चे प्रति हेक्टरी ३५० ते ४०० क्विंटल उत्पादन मिळते.




### महत्वाच्या घटना

१८७३ : मुंबई शेअर बाजार एका वडाच्या झाडाखाली सुरू झाला.
१८७४ : इंग्लंडमधील हाऊस ऑफ कॉमन्समध्ये मांजर शिरल्यामुळे सभागृहाचे कामकाज थांबले.
१८७५ : भारतातील पहिला स्टॉक एक्सचेंज म्हणजेच मुंबई स्टॉक एक्सचेंज ची स्थापना मुंबईतील दलात स्ट्रीट येथे करण्यात आली.
१८७७ : विंबल्डन चॅम्पियनशिप सुरु झाली.
१८८९ : अमेरिकेतील प्रसिद्ध वर्तमानपत्र द वॉल स्ट्रीट चे प्रकाशन करण्यात आले.
१८९३ : डॉ. डॅनियल हेल यांनी जगातील पहिली 'ओपन हार्ट' शस्त्रक्रिया शिकागो येथे यशस्वी केली.
१९४४ : ब्रिटीशांच्या राजवटीपासून भारताला स्वतंत्र करण्यासाठी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी आझाद हिंद सेनेचे नेतृत्व स्वीकारले.
१९५१ : भारताची पहिली पंचवार्षिक योजना प्रसिद्ध करण्यात आली.
१९६९ : वाघ हा भारताचा राष्ट्रीय प्राणी घोषित करण्यात आला.
१९९१ : दक्षिण आफ्रिका देशाला ऑलिम्पिकमध्ये सहभाग घेण्यास पुन्हा परवानगी मिळाली.
२००० : अमेरिकेच्या पीट सॅम्प्रसने ऑस्ट्रेलियाच्या पॅट्रिक राफ्टरचे आव्हान मोडून काढीत विम्बल्डन टेनिस स्पर्धा सातव्यांदा जिंकली. त्याबरोबरच सॅम्प्रसने आपल्या कारकिर्दीतील तेरावे ग्रँड स्लॅम विजेतेपद पटकावून रॉय इमर्सन यांचा बारा ग्रँड स्लॅम विजेतेपदांचा विक्रम मागे टाकला.
२०११ : सुदान राष्ट्रातून दक्षिण सुदान या नवीन देशाची निर्मिती.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६८९ : फ्रेंच लेखक अ‍ॅलेक्सिस पिरॉन यांचा जन्म.
१७२१ : जर्मन लेखक योहान निकोलॉस गोत्झ यांचा जन्म.
१८१९ : एलियास होवे शिवणयंत्राचा संशोधक (मृत्यू: ३ आक्टोबर १८६७)
१८४५ : साली ब्रिटीश कालीन भारतातील सन १९०५-१९१० काळातील व्हाईसरॉय आणि भारताचे गव्हर्नर जनरल लॉर्ड मिण्टो द्वितीय यांचा जन्मदिन.
१९०० : भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे राजकारणी व माजी संसदीय कार्यमंत्री तसचं, मध्यप्रदेश राज्याचे माजी राज्यपाल सत्य नारायण सिन्हा यांचा जन्मदिन.
१९२१ : रामभाऊ म्हाळगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक, जनसंघ या राजकीय पक्षाचे महाराष्ट्राचे पहिले सरचिटणीस आणि विधानसभेतील पहिले आमदार, तसेच भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्राचे पहिले प्रादेशिक अध्यक्ष (मृत्यू: ६ मार्च १९८२)
१९२५ : वसंतकुमार शिवशंकर पदुकोण ऊर्फ 'गुरू दत्त' प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक, निर्माते आणि अभिनेते. त्यांचे 'चौदहवी का चांद', 'कागज के फूल', 'सीआयडी', 'मि. अंड मिसेस ५५', 'आरपार' आणि 'प्यासा' इ. चित्रपट लोकप्रिय ठरले. त्यांच्या 'साहिब बिबी और गुलाम' या चित्रपटाला राष्ट्रपतीपदक मिळाले. (मृत्यू: १० आक्टोबर १९६४)
१९२६ : नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ बेन मॉटलसन यांचा जन्म.
१९३० : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते आणि पटकथालेखक के. बालाचंदर यांचा जन्म. (मृत्यू: २३ डिसेंबर २०१४)
१९३८ : हरी जरीवाला ऊर्फ 'संजीव कुमार' रुपेरी चित्रसृष्टी निखळ अभिनयाच्या जोरावर गाजवणारे कसदार अभिनेते (मृत्यू: ६ नोव्हेंबर १९८५)
१९४४ : भारतीय-इंग्रजी इतिहासकार आणि शैक्षणिक जूडिथ एम. ब्राउन यांचा जन्म.
१९५० : युक्रेन चे पंतप्रधान व्हिक्टर यानुकोविच यांचा जन्म.
१९७१ : नेटस्केप चे सहसंस्थापक मार्क अँडरसन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८५६ : अ‍ॅमेडीओ अ‍ॅव्होगॅड्रो इटालियन रसायनशास्त्रज्ञ (जन्म: ९ ऑगस्ट १७७६)
१८६५ : इटलीचे महान रसायनशास्त्रज्ञ अमेडिओ अवोगॅड्रो यांचे निधन.
१९१० : व्हिक्टोरिया क्रॉसचा प्राप्तकर्ता ब्रिटीश सैन्य अधिकारी मेजर जॉर्ज मुरे रोलँड यांचे निधन.
१९३२ : किंग कँप जिलेट अमेरिकन संशोधक व उद्योजक (जन्म: ५ जानेवारी १८५५)
१९४४ : युद्धप्रसंगी राष्ट्रकुल सैन्याला पुरविल्या जाणार्या सेवाप्रसंगी शत्रूच्या सामन्यात शौर्याचा सर्वात उच्च आणि प्रतिष्ठित पुरस्कार व्हिक्टोरिया क्रॉसचे विजेता फ्रँक गेराल्ड ब्लॅकर यांचे निधन.
१९६८ : ह. भ. प. शंकर वामन तथा 'सोनोपंत' दांडेकर स. प. महाविद्यालयाचे माजी प्राचार्य तत्वज्ञानाचे प्राध्यापक व प्रवचनकार, महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचे प्रणेते (जन्म: २० एप्रिल १८९६)
१९९३ : संगीतकार व वाद्यवृंद संयोजक या सोनिक-ओमी (काका-पुतणे) जोडीतील सोनिक यांचे निधन (जन्म:)
२००५ : डॉ. रफिक झकारिया महाराष्ट्राचे नगरविकासमंत्री आणि लोकसभा सदस्य (जन्म: ५ एप्रिल १९२०)
२००५ : प्रसिद्ध इराणी भाषांतरकार, संपादक, कोशकार आणि सहित्यीक समिक्षक करीम इमामी यांचे निधन.

# वृक्षतोडीकडे जिल्हा प्रशासनाचे दुर्लक्ष

## जिल्हाधिकारी कार्यालयातील सागवानाचे झाड तोडले : निषेधार्थ वृक्षप्रेमींकडून श्रद्धांजली अर्पण

बीड । प्रतिनिधी

संपूर्ण मराठवाड्यात बीड जिल्ह्यात २.४ इतके कमी वनक्षेत्र असुन निसर्गाचा समतोल राखण्यासाठी ३३ टक्के वनक्षेत्र अपेक्षित आहे.वनक्षेत्र कमी असल्याने बीड जिल्ह्यात वारंवार दुष्काळाचे संकट येत आहे.

वनक्षेत्र आणि हरितक्षेत्र वाढविण्यासाठी जिल्हा प्रशासन ठोस भूमिका घेत नसल्याचे दिसून येते.नगररोड वरील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारातील संरक्षक भिंतीच्या आतील रस्ता कामास कोणताही अडथळा न करणा-या १५ वर्षे वयोमान असणाऱ्या सागवानाच्या झाडाची काल दि.७ रविवार रोजी आर्थिक लाभापोटी कत्तल करण्यात आली.शासकीय कार्यालयाच्या जिल्हाधिकारी नगरपालिका, सार्वजनिक बांधकाम , राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, वनविभाग आदि.विभागाची परवानगी न घेताच वृक्षतोड करण्यात आली असुन संबंधित प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात यावेत यासाठी वृक्षतोड प्रकरणात कठोर कारवाई करण्यात यावी यासाठी मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे, शेख युनुस, रामनाथ खोड,शेख मुबीन,शेख मुस्तफा यांनी निष्क्रीय जिल्हा प्रशासनाला श्रद्धांजली अर्पण करत निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांना निवेदन देण्यात आले. याचवेळी वृक्षतोड करून आंदोलनकर्ते यांचा निवारा हिरावून घेणा-या जिल्हा प्रशासनाने निवारा शेड उपलब्ध करून देण्यात यावा अशी मागणी करण्यात आली.






**आंदोलकांसाठी निवारा शेड उपलब्ध करा :** जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सामाजिक कार्यकर्ते, नागरिक संघटना तसेच पिडीत विविध मागण्यांना घेऊन न्याय हक्कांसाठी लोकशाही मार्गाने आंदोलने, निदर्शने, उपोषणे करतात.प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे काही आंदोलने आठवडाभर तर काही त्यापेक्षाही जास्त दिवस चालतात.सध्या रस्ता रूंदीकरणाच्या कामासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड करण्यात आली असून आंदोलकांचा निवारा हिरावला असुन उन्हाळ्यात आणि पावसाळ्यात त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे त्यामुळे निवारा शेड उपलब्ध करून देण्यात यावे.

### बेसुमार वृक्षतोड प्रकरणात ठोस कारवाई करा

बीड जिल्ह्यात वृक्षतोड बंदी असतानाही वनविभागातील अधिकारी आणि कर्मचारी यांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असुन पुराव्यानिशी लेखी तक्रार केल्यानंतर कारवाई होत नाही बीड तालुक्यातील कानडीघाट येथे ५० वर्षे वयोमान असणाऱ्या १५ वृक्षांची अवैध वृक्षतोड प्रकरणात लेखी तक्रार तसेच आंदोलनानंतर सुद्धा वनविभागाने केवळ स्थळपंचनामा केला आणि वृक्षतोड करणारांशी आर्थिक संगनमत करून ठोस कारवाई केली नाही या घटनेला वर्ष उलटले असुन संबंधित प्रकरणात कारवाईस टाळाटाळ करणाऱ्या वनविभागातील जबाबदार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी.

## नवस फेडण्यासाठी चालेल्या भुसारी यांचे खा. सोनवणे यांनी केले स्वागत

युसूफवडगांव

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील पं.स.सदस्य व खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांचे खंदे समर्थक उमाकांत भुसारी यांनी बप्पा खासदार व्हावे म्हणुन श्री क्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ यांच्या चरणी नवस केला होता.तो फेडण्यासाठी ते पायी चालत चालले असुन हे कळताच त्यांनी आपल्या या एकनिष्ठ कार्यकर्त्याचे खासदार साहेबांनी अर्ध्या रस्त्यात जाऊन त्यांचे स्वागत केले.



नुकत्याच देशात लोकसभा निवडणुका पार पडल्या.यावेळी बीड लोकसभेला बजरंग सोनवणे हे उभा होते व ते या निवडणुकीत विजयी व्हावे अशा प्रकारचा नवस त्यांनी श्री स्वामी समर्थ यांच्या चरणी केला होता ते जर निवडुन आले तर मी युसूफवडगांव ते श्रीक्षेत्र अक्कलकोट असे १६५ किमीचे अंतर पायी चालत जाऊन श्री स्वामी समर्थ यांच्या चरणी लीन होईन असा त्यांनी नवस केला होता.

नवसा नुसार बजरंग बप्पा सोनवणे हे बीड जिल्ह्याच्या खासदार पदी निवडुन आले त्यामुळे नवस फेडण्यासाठी उमाकांत भुसारी आपल्या सहकाऱ्या समवेत गुरूवारी पायी चालत श्री क्षेत्र अक्कलकोट निघाले होते.रविवारी खा. बजरंग सोनवणे यांना याची माहिती मिळताच त्यांनी तात्काळ पायी चाललेल्या उमाकांत भुसारी व त्यांचे सहकारी विकास जाधव, राधेश्याम खंडेलवाल, बळीभाऊ लामतुरे यांची सोलापूर जिल्ह्यातील इटळ येथे जाऊन त्यांची सदिच्छा भेट आपल्यावर असलेल्या प्रेमाबद्दल त्यांनी त्यांचे मनापासून आभार मानले व त्यांचे हृदय पुर्वक आभार माणुन त्यांचे स्वागत करून पुढील मार्गासाठी शुभेच्छा दिल्या यावेळी खासदार त्याच्या सोबत २/३ किमी चालले.

## महात्मा बसवेश्वर पुतळ्याला संरक्षण व्यवस्था करा- जयदत्त क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

शहरातील जगत ज्योती क्रांतीसुर्य श्री महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्याला संरक्षण व्यवस्था नसल्याच्या तक्रारी समाज बांधवाकडून होत आहेत तसेच पुतळ्याला कुठलेही संरक्षण नसल्याने विटंबनेचा प्रकार होऊ लागला आहे.यासाठी प्रशासनाने तात्काळ संरक्षण व्यवस्था करावी अशा सूचना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना दिलेल्या निवेदनात केल्या आहेत.

पेठ बीड भागातील यशवंत उद्यानात जगत ज्योती क्रांतीसुर्य श्री.महात्मा बसवेश्वर यांचा पुतळा असून या पुतळ्याला संरक्षण भिंत नसल्यामुळे पुतळ्याची विटंबना होत आहे. पुतळ्याची समाज कंटकाव्दारे सतत तोडफोड होते. यामुळे पुतळ्याची सतत अवहेलना होत असल्यामुळे बीड शहरातील भाविक व समाजात असंतोष निर्माण होत आहे. या करीता श्री महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्या भोवती संरक्षण भिंत निर्माण करणे आवश्यक आहे.तसेच संरक्षणासाठी सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविण्यात यावेत व या ठिकाणी सुरक्षा रक्षक कायमस्वरुपी नियुक्त करण्यात यावा. या करीता नगर परिषद, बीड प्रशासनाला तातडीने सूचना देऊन तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. याबाबत समाज बांधवांनी माजी मंत्री क्षीरसागर यांच्याकडे याबाबत निवेदन देऊन लक्ष देण्याची मागणी केली त्यावरून माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन सूचना केल्या आहेत.

## बीड शहर चोरांपासून भयमुक्तसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन



बीड । प्रतिनिधी

बीड शहरात सर्वत्र सध्या चोरांचा सुळ-सुळाट सुरु असून वाढत्या चोर्यांमुळे नागरिकांची झोप उडाली आहे त्यामुळे चोरांवर लगाम लावून त्यांना तात्काळ अटक करावी या मागणीसाठी मनसे जिल्हा सचिव सोमेश कदम व मनसे शहराध्यक्ष करण लोंढे यांनी बीडकरांना भयमुक्त करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आज आंदोलन केले असून वाढत्या चोर्यांवर नियंत्रण आणण्यासाठी लवकरात लवकर प्रशासनाने योग्य उपाययोजना करावी अशा मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी, बीड आणि पोलीस अधिक्षक, बीड यांना दिले आहे.

बीड शहरामध्ये मागच्या दहा दिवसापासून चोरांनी धमाकूळ घातलेला आहे आणि चोरांची भीती प्रचंड बीड शहराच्या नागरिकांमध्ये बसलेली आहे आणि या भीतीमुळे शहराचे वातावरण भीतीमय झालेले आहे आणि अशातच पोलिसांनी देखील कबुली दिली आहे की चोर खूपच खुकार असल्याचे पोलिसांनी देखील हे चोर मोठा दरोडा, रोड रॉबरी त्याचबरोबर खून देखील करण्याच्या तयारीत असल्याचं पोलिसांच्या एका वरिष्ठ अधिकार्यांनी सांगितल्यामुळे बीड शहरात भीतीच मोठं वातावरण निर्माण झालेला आहे .

परिस्थिती पोलिसांच्या हाताबाहेर गेली की काय? असा प्रश्न बीड शहरातील नागरिकांमध्ये पडलेला आहे. वाढत्या चोर्यांवर नियंत्रण आणण्यासाठी लवकरात लवकर प्रशासनाने योग्य उपाययोजना करणे गरजेचे आहे आणि बीडकरांना भयमुक्त करावे लवकरात लवकर परिस्थिती नियंत्रणात नाही आली आणि चोरांना अटक नाही झाली तर आणखीन तीव्र आंदोलन करु असे पत्रकाद्वारे जिल्हा सचिव सोमेश कदम , शहराध्यक्ष करण लोंढे, कुणाल उगले उपजिल्हाध्यक्ष, ऋषिकेश गिराम विद्यार्थीसेना जिल्हाध्यक्ष यांनी पत्रकाद्वारे केले आहे

## सेवानिवृत्त पोलीस अधिकारी-कर्मचारी समिती अध्यक्ष राजीनामा देणार

बीड । प्रतिनिधी

पोलीस बांधवांच्या मागण्या मान्य करण्यासाठी महाराष्ट्रात पहिली संघटना स्थापन करुन पोलीसांचे प्रश्न इतके दिवस शासन दरबारी मांडून त्यासाठी लढा देवून आजपर्यंत आवाज उठविला परंतू आता शेतकरी व सामाजिक कार्य करण्यासाठी राजीनामा देणार असल्याचे पत्रकाद्वारे संतराम घोडके पाटील यांनी कळविले आहे.

पोलीस बांधवाच्या मागण्या मान्य करण्यासाठी सेवानिवृत्त पोलीस अधिकारी-कर्मचारी समिती स्थापन केली. त्यानंतर मुख्यमंत्री/गृहमंत्री, पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, आय.जी., पोलीस अधिक्षक यांच्याशी वेळोवेळी भेटी घेवून प्रश्न मार्गी लावले. अनेकांना पेन्शन मिळवून दिली, पोलीस मुख्यालयापासून पोलीस मोर्चा काढून शासनाकडून पोलीसांच्या मागण्या मान्य करुन घेतल्या. तसेच संघटनेसाठी कार्यालय मिळावे यासाठी प्रयत्न करुन कार्यालयाला जागा देखील मिळवून दिली. परंतू आता शेतकरी बांधवांचे प्रश्नांवर आवाज उठविण्यासाठी तसेच सामाजिक प्रश्नांवर सरकारला जागे करण्यासाठी सक्रीय राजकारणात उतरणार असल्याचे पत्रकाद्वारे संतराम घोडके पाटील यांनी कळविले आहे.

## महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजनेला ३१ ऑगस्ट पर्यंत मुदतवाढ

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना २०२३ च्या दुसरा टप्याला ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत ची मुदत वाढ देण्यात आली असल्याचे सहाय्यक जिल्हा निबंध तथा मुद्रांक शुल्क अधिकारी बीड यांनी कळविले आहे. योजना महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना २०२३ ही योजना दोन टप्यात राबविण्यात आली आहे. पहिला टप्पा ०१ डिसेंबर २०२३ ते ३१ जानेवारी २०२४ पर्यंत होता. आणि योजनेचा दुसरा टप्पा दिनांक ०१ फेब्रुवारी २०२४ ते ३१ मार्च २०२४ या कालावधी असून ही योजना राबविण्यात आली होती. योजनेच्या दुसऱ्या टण्यासाठी दिनांक ३०/०६/२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. आता योजनेच्या दुसरा टप्पाला ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

यासह महसूल आणि वन विभागाच्या वतीने महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार ब (असाधारण क्रमांक २४३) च्या आदेशातील जोडपत्र () खंड (फ) च्या नंतर नव्याने समाविष्ट करण्यात आलेली आहे याअंतर्गत महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या जमिनीवर वसलेल्या नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थेने निवासी किंवा अनिवासी घटकांबाबतचे पहिले वाटप पत्र किंवा शेअर सर्टिफिकेट किंवा स्टॅम्प नसलेल्या कागदावर किंवा लेटर हेडवर जारी केलेले किंवा अंमलात आणलेले करार महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) आणि विभागीय मंडळे किंवा शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (सिडको) किंवा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) किंवा महानगरपालिका, नगर पंचायत किंवा विकास किंवा नियोजन प्राधिकरणांनी मंजूर केलेले किंवा गठित राज्य सरकारच्या विहित नियमांनुसार राहणार असल्याचे ही कळविण्यात आलेले आहे. सोबत जोडपत्र जोडलेले आहे.

## पुस्तकं नेहमी ताजीतवानी राहतात - सय्यद हसीन अख्तर

बीड । प्रतिनिधी

शहरातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, प्रसिद्ध स्तंभलेखक, कवी, शायर, उर्दू साहित्याचे गाढे अभ्यासक तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील उर्दू विभागाचे स्वीकृत सदस्य सय्यद हसीन अख्तर यांनी कर्नाटक राज्यातील रायचूर जिल्ह्यात असलेल्या इस्लामिक रिसर्च सेंटर ला नुकतीच दिनांक ४ व ५ जुलै २०२४ रोजी सदिच्छा भेट दिली. तेव्हा अध्यक्ष मुहम्मद अब्दुल जावीद यांनी त्यांचा उर्दू साहित्य पुस्तके सप्रेम भेट देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी एजाज़ भाई, सय्यद नज़ीर, अहेमद कादरी, मतीन रहिमी यांची प्रमुख उपस्थिती होती.




यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना सय्यद हसीन अख्तर म्हणाले की, एक दुसऱ्याच्या सत्कार व सन्मानाप्रीत्यर्थ पुष्पगुच्छ देण्याऐवजी साहित्याची देवाणघेवाण करावी कारण फुलं झाडांवरून तोडल्यानंतर कोमेजून जातात पण पुस्तके एकदा मुद्रित केली आणि त्याला कितीही वेळा एकाने दुसऱ्याला, दुसऱ्याने तिसऱ्याला अशाप्रकारे अनेकदा देवाणघेवाण केली तरीही ती नेहमी ताजीतवानी राहतात. शिवाय पुस्तके वाचल्याने माणसांमध्ये प्रगल्भता येते. अभ्यासूपणा व आकलन क्षमता वाढते म्हणून प्रत्येक माणसाने एक दुसऱ्याच्या आदराप्रित्यर्थ व सन्मानावेळी पुस्तकांचे आदान-प्रदान करावे. असे मनोगत सय्यद हसीन अख्तर यांनी यावेळी व्यक्त केले. त्यांच्या या मनोगतला सर्व उपस्थितांनी भरभरून दाद दिली.

# शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या अदामा कंपनीवर गुन्हे दाखल करा : नारायण डक

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी येथील शेतकरी बाळासाहेब शेंडगे यांनी त्यांच्या दीड एकर सोयाबीन पिकातील तन नष्ट करण्यासाठी अदामा कंपनीच्या शाकेद नावाच्या तणनाशकाची फवारणी केली. त्यावेळी दीड एकर जमिनीतील ३० दिवसाचे सोयाबीन पीक जळून पूर्णतः खाक झाले. पाण्यावर लागवड केलेल्या शेतकर्याच्या सोयाबीन पिकाचे दीड लाख रुपयाच्या नुकसानीस अदामा कंपनी जबाबदार आहे. याप्रकरणी कंपनीवर कारवाई करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माजलगाव विधानसभा अध्यक्ष नारायणराव डक यांनी केली आहे.



या कंपनीने शेतकर्याची फसवणूक करून त्यांच्या सोयाबीन पिकाचे नुकसान केले असल्याने शेतकर्याने ५ जुलै रोजी तालुका कृषी अधिकार्यासह पंचायत समिती, उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय यांना फसवणूक झाल्याबाबत तक्रार दाखल करून न्याय देण्याची मागणी केली. न्याय न दिल्यास १५ जुलै रोजी आत्मदहनाचा इशारा दिलेला असताना देखील कृषी अधिकारी व कृषी विभाग झोपेचे सोंग घेऊन बसलेले असून

दरम्यान शेतकऱ्याचे झालेले नुकसान भरून निघण्यासाठी नारायणराव डक यांनी राहुरी कृषी विद्यापीठातील बियाणे प्रमुख डॉ.आनंद सोळंके यांना संपर्क करून ही माहिती कळवली. यावर सकारात्मक प्रतिसाद देत त्यांनी सोयाबीनचे हे पीक कसे ठीक होईल यावर मार्गदर्शन करणार असल्याचे सांगितले.

आज पावतो शेतकर्याच्या झालेल्या नुकसानीची पाहणी कृषी विभागाकडून झालेली नाही. त्यामुळे नारायणराव डक यांनी ८ जुलै रोजी प्रत्यक्ष शेतकर्यांच्या बांधावर जाऊन झालेल्या नुकसानीची पाहणी केली. कृषी अधिकारी यांनी शेतकर्याच्या तक्रारीवरून पंचनामा करून संबंधित आदामा कंपनीवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत अशी मागणी यावेळी नारायण डाके यांनी केली.

## वसंतदादा पाटील महाविद्यालयात रासेयोमार्फत वृक्षारोपण



पाटोदा । प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ८ जुलै रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत महाराष्ट्र शासन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या रासेयो विभागाच्या निर्देशानुसार महावृक्ष लागवड मोहिमेअंतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, पदव्युत्तर विभाग संचालक डॉ. गणेश पाचकोरे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड यांच्यासह प्राध्यापक व रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी प्रत्येकी तीन वृक्षांची लागवड महाविद्यालय परिसरात केली.

या मोहिमेत १० स्वयंसेवकांनी उस्फूर्तपणे सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सूर्यकांत देशमुख, प्रा. मनिषा गाढवे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# दिंद्रुडमध्ये दफनविधी रोखल्याने तणाव

## मृतदेह माजलगावच्या उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आणून ठेवला; शेकडो वर्षांपासून त्या जागी आहे कब्रस्तान

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील दिंद्रुड येथील कब्रस्तानच्या जागेचे गॅजेट असुन सातबारासह वक्फ बोर्डातही त्याची नोंद आहे. जवळपास १३०० वर्षांपासून त्या जागी कब्रस्तान असतांनाही तेथील तहसील आणि पोलीस प्रशासनाने धर्मगुरू (आमीर साहाब) यांचा दफनविधी रोखल्याने दिंद्रुडमध्ये तणावसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. प्रशासनाने अचानक दफनविधी का रोखला ? असा प्रश्न उपस्थित करत संतप्त जमावाने मृतदेह माजलगाव येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आणून ठेवला. दुपारी उशिरापर्यंत मृतदेह उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोरच ठेवण्यात आला होता.संतप्त जमावाकडून प्रशासनाविरूध्द जोरदार घोषणाबाजी सुरू होती.दरम्यान दिंद्रुड येथील बाजारतळा लगत असलेल्या कब्रस्तानच्या जागेचे प्रकरण उच्च न्यायालयात सुरू आहे.शेकडो वर्षांपासून





त्या जागेत कब्रस्तान असुन त्या जागेत शेकडो कबरी आहेत असे असतांना पोलीस प्रशासनाने तहसीलचे आदेश असल्याचे सांगून दफनविधी रोखल्याने संताप व्यक्त होवू लागला आहे.

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील आमीर साहाब शेख सुलेमान हे गेल्या काही दिवसांपासून आजारी होते.दि ०८ जुलै सोमवार रोजी पहाटे त्यांचे निधन झाले.मृत्यूसमयी ते ८० वर्षांचे होते. नेहमीप्रमाणे दि ०८ जुलै सोमवार रोजी सकाळी दिंद्रुड बाजार तळालगत असलेल्या कब्रस्तानमध्ये त्यांच्या दफनविधीसाठी कबर खोदण्यात आली होती.त्याच ठिकाणी त्यांचा दफनविधी करण्यात येणार होता. ऐनवेळी दिंद्रुड पोलीसांनी त्याठिकाणी दफनविधी करण्यापासून समाज बांधवांना रोखले.त्यामुळे बराचवेळ तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. तहसीलदारांच्या आदेशावरून या ठिकाणी दफनविधी करता येणार नाही अशी भुमिका पोलीसांनी घेतली. मात्र त्या भुमिकेला मुस्लीम समाजाने विरोध करत ही जागा कब्रस्तानचीच आहे.त्याची गॅजेटमध्ये नोंद असुन वक्फ बोर्डातही कब्रस्तानचे पुरावे आहेत असे असतांनाही ऐनवेळी दफनविधी का रोखता ? असा प्रश्न उपस्थित करत संतप्त समाज बांधवांनी आमीर साहेबांचा मृतदेह माजलगाव येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या गेटवर आणून ठेवला.यावेळी प्रशासनाच्या विरूध्द जोरदार घोषणाबाजीही करण्यात आली.

### तहसीलदारांनी एक महिन्यापुर्वीच बैठक घेतली होती,तरीही दफनविधी रोखला

माजलगावच्या तहसीलदार वर्षा मनाळे यांनी दिंद्रुड येथील बाजारतळ आणि कब्रस्तानच्या जागेच्या अनुषंगाने समाज बांधवांची बैठक घेतली होती. सदरील जागेच्या प्रकरणात न्यायालयाचा निर्णय येईपर्यंत या जागेवर बाजारही भरवला जाईल आणि दफनविधीही करण्यात येईल असे सांगितले होते.मात्र आज अचानक दफनविधी रोखल्याने संताप व्यक्त होवू लागला आहे.कसल्याही प्रकारची नोटीस किंवा पुर्वसूचना न देता ऐन दफनविधीच्या वेळीच प्रशासनाने ही भूमिका घेतल्याने संताप व्यक्त होत असुन या प्रश्नी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांनी तात्काळ लक्ष घालावे अशी मागणी होवू लागली आहे.

# भयमुक्त परळीसाठी विधानसभा निवडणूक लढवणारच –राजेभाऊ फड



परळीत आयोजित पत्रकार परिषदेत घोषणा

परळी । प्रतिनिधी

राज्यातील महाविकास आघाडीच्या सर्व नेत्यांच्या भेटी घेऊन परळी विधानसभा निवडणूक लढविण्याची मी मागणी करणार असून, काहीही झाले तरी परळी विधानसभा निवडणूक आपण लढविणारच अशी घोषणा रासपचे नेते तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेभाऊ फड यांनी केली. सोमवारी परळी वैजनाथ येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

सोमवार दि ८ रोजी आयोजित पत्रकार परिषदेत पुढे बोलतांना राजेभाऊ फड म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार, शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यासह महाविकास आघाडीच्या सर्व नेत्यांच्या उद्यापासून भेटी घेणार असून, परळी विधानसभा निवडणुकीत उमेदवारी मिळावी यासाठी मी मागणी करणार आहे. मागील काळात विकासाच्या फक्त गप्पा मारण्यात आल्या मात्र प्रत्यक्षात विकास केला गेला नाही. या विधानसभा मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी मी राजकारणात येत आहे. बारामतीच्या धर्तीवर परळीचा आम्ही विकास करून दाखवू अशीही घोषणा त्यांनी केली. जर यात कोणी काही वेगळे करण्याचा प्रयत्न केला तर त्यांना जशास तसे उत्तर दिले जाईल. परळीला आता मला भयमुक्त करायचे आहे, पान ३ वर

# सह्याद्री पब्लिक स्कूल येथे पालक मेळावा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालक,शिक्षक समन्वय होणे खूप गरजेचे असते. यासाठी सह्याद्री पब्लिक स्कूल येथे पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अध्यक्ष शाळेचे आदरणीय भागवत इंगळे होते.

तर प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त शिक्षक संतराम कराड याची उपस्थिती होती तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून रामकिशन मस्के, शाळेचे कोष्यधक्ष रेणुका इंगळे शाळेच्या मुख्याध्यापिका छाया जाधव, शालेय समितीच्या अध्यक्षा चाटे, व उपाध्यक्ष काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.या पालक मेळाव्याचे प्रस्ताविक मुख्याध्यापिका छाया जाधव यांनी केले. शाळेमध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परिक्षेचे सखोल मार्गदर्शन दोडके यांनी केले.तर विद्यार्थी सर्वगुणसंपन्न बनण्यासाठी पालकांची भुमिका कशी असावी याबद्दल सखोल माहिती मुंडे जे. एस यांनी व्यक्त केली. शाळेचे सहशिक्षक गजानन कदम यांनी पालकांच्या समस्येचे विविध प्रकारचे उदाहरणे देऊन निरसन केले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले कराड व मस्के यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष. इंगळे म्हणले की तुमच्या पाल्याचा विकास हा आमचा ध्यास आहे. अशा शब्दांत आपले मनोगत व्यक्त करून अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे संचालन वैशाली सोळंके यांनी तर आभार गायकवाड यांनी मानले. या कार्यक्रमाची सुरुवात जिजाऊ वंदनेनं तर सांगता माहाराष्ट्र गीताने करण्यात आली.

# सरकारने शेतकरी कर्जमाफी करावी - राजेंद्र आमटे

शिवसंग्राम शेतकरी आघाडीचे निवेदन

**व्यापाऱ्यांना कर्जमाफी, मग शेतकऱ्यांना का नाही?**



बीड । प्रतिनिधी

शेतकरी मागील दोन तीन वर्षापासून दुष्काळाने कर्जाच्या खाईत लोटला गेला. खाजगी व सरकारी बँक कर्जामुळे अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यामुळे हजारो शेतकऱ्यांचे कुटुंब उद्ध्वस्त झाले. निवडणुकीच्या खेळात गुंतलेल्या सरकारने तात्काळ शेतकऱ्यांना कर्जमाफी करावी अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात शिवसंग्राम शेतकरी आघाडीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे सह आदींनी दिला.

शेतकरी मागील वर्षी दुष्काळाने होरपळलेला आहे. शेतकरी दुष्काळात होरपळत असताना सरकार व विरोधक फक्त निवडणुकीत दंग होते. दुष्काळात शेतकऱ्यांना दुष्काळी अनुदान नाही, शेतकऱ्यांना कोणत्याही उपाय योजना केल्या नाहीत.

अडाणी, अंबानी सारख्या शेकडो व्यापाऱ्यांना न माघता कर्जमाफी करणाऱ्या दळभद्री सरकारला कर्जामुळे होणाऱ्या शेतकरी आत्महत्या दिसत का नाहीत? शेतकऱ्यांना तत्काळ संपूर्ण कर्जमाफी करण्यात यावी या मागणीसाठी शिवसंग्राम शेतकरी आघाडीच्या वतीने उपजिल्हाधिकरी कार्यालयात निवासी उपजिल्हाधिकारी यांना दिवेदन देण्यात आले. या वेळी शेतकऱ्यांना तत्काळ संपूर्ण कर्जमाफी करावी अन्यथा शिवसंग्राम शेतकरी आघाडीच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला. या वेळी शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, शिवसंग्राम सरचिटणीस सुहास पाटील, पंचायत पान ३ वर

### माजलगाव बाजार समितीच्या वतीने राष्ट्रीय कृषी बाजार (ई–नाम) कार्यप्रणाली शिबिराचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने



मुख्य बाजार आवार फुले पिंपळगाव येथे दिनांक १० जुलै बुधवार रोजी सकाळी १०:३० ते १२:३० वाजेपर्यंत राष्ट्रीय कृषी बाजार (ई–नाम)ची कार्यप्रणाली विषयी माहिती व त्यापासून मिळणारे फायदे याबाबत मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे

या शिबिरास प्रमुख मार्गदर्शक म्हणून पुणे येथील मुख्य प्रशिक्षक बाबासाहेब नाईकनवरे हे मार्गदर्शक म्हणून लाभणार आहेत तरी या शिबिराचा अडते,कर्मचारी, शेतकरी बांधवांनी व सर्व बाजार घटकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे यांनी केले आहे

# नानाभाऊ पटोले यांच्या निर्देशानुसार विधान सभेसाठी इच्छुक उमेदवारांचे अर्ज मागवले

**केज । प्रतिनिधी**

राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाकडून विधानसभा निवडणुकाची तयारी युध्दपातळीवर सुरू केली सप्टेंबर ऑक्टोबर मद्ये होत असलेल्या विधान सभा निवडणुकीच्या अनुषंगाने राज्यातील सर्व जिल्हा अध्यक्षांना प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील इच्छुक उमेदवारानी १० आगष्ट पर्यंत प्रदेश कार्यालयात संपर्क साधण्या संदर्भात सुचना प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांनी दिल्या आहेत.

राज्यातील विधानसभा निवडणुका या सप्टेंबर आक्टोबर मधे लागणार असल्याने व लोकसभा मधील राष्ट्रीय कॉग्रेस च्या विजया नंतर विधानसभा निवडणुकीच्या आखाड्यात कॉग्रेसचे प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांच्या आदेशावरून उपाध्यक्ष व प्रशासन संघटक नाना गावंडे यांनी प्रत्येक जिल्हा अध्यक्ष यांना पत्र आदेश दिले आहेत की जे विधानसभा निवडणूकीसाठी इच्छुक आहेत त्यांनी प्रदेश कार्यालयात १० आगष्ट पर्यत संपर्क साधावा तसेच आपल्या उमेदवारी मागणी अर्ज सादर करावा.असे आदेश राष्ट्रीय कॉग्रेसच्या सर्व जिल्हा अध्यक्ष यांना पक्षाच्या वतीने पत्राद्वारे सुचना दिल्या आहेत.

राष्ट्रीय कॉग्रेस ने लोकसभा निवडणूक मधे अतिशय चांगली कामगिरी करत सर्वात जास्त लोकप्रतिनिधी महाराष्ट्रातील कॉग्रेस पक्षाच्या वतीने दिले गेले आहेत. त्यामुळे लोकसभा मध्ये महाराष्ट्रात राष्ट्रीय कॉग्रेस हा सर्वात मोठा पक्ष ठरला आहे.त्यानुसार विधानसभा निवडणूक मधेही सर्वात जास्त जागा या राष्ट्रीय कॉग्रेसला निश्चितच अपेक्षित असल्याचे विज्ञान व तंत्रज्ञान सेलचे प्रदेश प्रमुख सुरेश यादव यांनी सांगितले असून आता विधानसभेतही राष्ट्रीय कॉग्रेसच सर्वात मोठा पक्ष असणार आहे असेही ते म्हणाले. त्यामुळे राष्ट्रीय कॉग्रेसच्या विधानसभा लढवण्यास इच्छुक असणाऱ्या उमेदवारानी प्रदेश कार्यालयात संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे . ज्यांचे उमेदवारी मागणी अर्ज येतील त्यांचाचा विचार पक्षाकडून होईल असेही सांगण्यात आले आहे.

# मुख्यमंत्री – 'माझी लाडकी बहीण' या योजनेचा लाभ सर्व पात्र माता भगिनींनी घ्यावा–राजकिशोर मोदी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राज्याच्या अर्थसंकल्पात जाहिर केलेल्या ''मुख्यमंत्री – लाडकी बहीण'' योजनेचा फायदा राज्यातील सर्व पात्र माता भगिनींनी घ्यावा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी केले आहे. या योजने अंतर्गत राज्यातील २१ ते ६५ वयोगटातील सर्व पात्र महिलांना या योजनेचा लाभ मिळणार असल्याचे राज्याचे मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री यांनी जाहिर केले असल्याचे मोदी यांनी सांगत त्याचा लाभ घेण्यासाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन राजकिशोर मोदी यांनी केले आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजितदादा पवार यांनी राज्याच्या अर्थसंकल्पात जाहिर केलेल्या



'मुख्यमंत्री – माझी लाडकी बहिण' ही योजना नुकतीच जाहीर केली. अतिशय अल्पावधीतच या योजनेची लोकप्रियता वाढल्याने सदर योजनेला मिळणारा प्रतिसाद लक्षात घेता या योजनेच्या निकषांमध्ये सुधारणा करत काही अटी शिथील करून अर्ज सादर करण्याची मुदत ३१ ऑगस्ट पर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यामुळे अंबाजोगाई शहर व परिसरातील पात्र माता भगिनींनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी केले आहे. त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी याकामी पुढाकार घेवून गरजू व पात्र महिलांना याकामी मदत करावी असे आवाहनही राजकिशोर मोदी यांनी केले आहे.

महाराष्ट्राचा अर्थसंकल्प जाहिर करताना उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांनी 'मुख्यमंत्री–माझी लाडकी बहिण' ही अतिशय लोकप्रिय योजना जाहिर केली आहे. योजनेतील पात्र लाभार्थ्यांना दि.१जुलै२०२४ पासून दरमाह १५०० रुपये आर्थिक लाभ शासनाच्या वतीने मिळणार आहे. त्यामुळे या योजनेला मिळणारा प्रतिसाद लक्षात घेता योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत पंधरा दिवसांहून दोन महिन्यापर्यंत वाढविल्यामुळे लाभार्थी महिलांना आता ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत अर्ज दाखल करता येणार आहेत. त्याचबरोबर या योजनेतील अनेक निकषांमध्ये सुधारणा करून आणि काही अटी शिथील करत असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी नुकतीच केली आहे. या योजनेचा अधिकाधिक महिलांना सहज सुलभपणे लाभ घेता यावा यासाठी स्थानिक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यकर्त्यांनी सहकार्य करण्याचे आवाहन सुध्दा राजकिशोर मोदी यांनी केले आहे.

पान ३ वर

# तहसीलदारांच्या विनंतीस दुसऱ्यांदा नकार देत भाई आकाश निर्मळ यांचे आमरण उपोषण सुरूच

**बीड । प्रतिनिधी**

धनगर व वडार जमतीचा एस्? टी प्रवर्गात आरक्षणाची अंमलबजावणी करा यासाठी भाई आकाश निर्मळ यांचे आमरण उपोषण २९ जून पासून बार्शी नाक्यावर सुरु असून आज उपोषणाचा सहावा दिवस असून प्रशासनाने जाणिवपूर्वक उपोषणाकडे पाठ फिरविली असल्याचे दोन्ही समाजामधून बोलले जात आहे...





धनगर व वडार समाज आर्थिक दृष्ट्या मागासलेला असून या भटक्या जातीच्या समावेश एसटी प्रवर्गात करावा अशी गेल्या अनेक दिवसापासून मागणी होत आहे .मात्र या मागणीला राज्य सरकार सकारात्मक प्रतिसाद देत नाही .

या मागणीला अधिक धार आणण्यासाठी भाई आकाश निर्मळ यांनी धनगर आणि वडार समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षणाची अंमलबजावणी करा यासाठी अमर उपोषण सुरू केले असून ते गेल्या दहा दिवसापासून बीड येथे जुन्या आरटीओ मैदानावर हे उपोषण चालू असून या उपोषणास भेट देण्यासाठी माजी मंत्री प्रा. सुरेश नवले, अंबाजोगाई पंचायत समिती सदस्य व्यंकटेश चामणार, माजलगाव पंचायत समितीचे सदस्य अविनाश कांडुरे धनगर समाज कर्मचारी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अंकुशराव निर्मळ, आय कॉंग्रेसचे नेते दादासाहेब मुंडे, मराठा आरक्षण समन्वयक गंगाधर काळकुटे, राष्ट्रमाता अहिल्यादेवी समाज परिवर्तन आघाडीचे संस्थापक अध्यक्ष बाबासाहेब लंबाटे, धनगर समाजाचे युवा नेते प्रकाश सोनसाळे मा. पंचायत समिती सदस्य देविदास शेंडगे, प्रा. राजेंद्र गाडेकर, धनगर समाज कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. भगवान माने युवानेते अंगद किवणे, राष्ट्रीय समाज पक्षाचे बीड जिल्हा अध्यक्ष आण्णासाहेब मतकर, यशवंत पान ३ वर

# छत्रपती शिवाजी महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचा ठराव सर्वानुमते मंजूर

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील अग्रगण्य असलेल्या माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीची मासिक बैठक दिनांक ०८ जुलै सोमवार रोजी बाजार समितीच्या सभागृहामध्ये बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली



या बैठकीमध्ये माजलगाव मुख्य बाजार आवार फुले पिंपळगाव येथील कार्यालयाच्या वरच्या मजल्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक उभारण्यात येणार असून त्यास सूचक नितीनराव नाईकनवरे तर अनुमोदक मनोज जगताप यांनी केले तसेच मुख्य बाजार आवार फुलेंपिंपळगाव या ठिकाणी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारणी करण्यात येणार असून त्यास सूचक वीरेंद्र सोळंके तर अनुमोदक अमोल जाधव यांनी केले या बैठकीमध्ये दोन्ही स्मारकास सर्वानुमते ठराव मंजूर करून मान्यता देण्यात आली यावेळी संचालक अशोक डक,वीरेंद्र सोळंके,उद्धव नाईकनवरे,दत्तात्रय डाके,मनोज जगताप,संजय कचरे,सौ.सरस्वती घायतिडक, सौ.अंजली भोसले, नंदकिशोर सजगणे,भागवतराव शेजुळ, भगवानराव आगे,प्रभाकरराव होके, जुगलकिशोर नावंदर,कदीर खा पठाण,सचिव हरिभाऊ सवणे यांची उपस्थिती होती.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुणे, साताऱ्याला पावसाचा रेड अलर्ट; ? हवामान विभागाकडून पाच दिवसांचा अंदाज

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे, गेल्या २४ तासांपासून मुंबई महानगर परिसरामध्ये सुरू असलेल्या मुसळधार पावसानंतर पुन्हा मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागाकडून पुढील पाच दिवसांसाठी राज्यामध्ये विविध जिल्ह्यात पावसाचा इशारा देण्यात आला आहे. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, सातारा आणि पुणे जिल्ह्यामध्ये रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यामुळे प्रशासनाकडून सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे. पालघर, ठाणे, रत्नागिरी, रायगड या जिल्ह्यामध्ये ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.



कोकणामध्ये आज काही ठिकाणी अतिवृष्टीची शक्यता

हवामान विभागात दिलेल्या अंदाजानुसार कोकणामध्ये आज काही ठिकाणी अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. पुणे आणि सातारा जिल्ह्यामध्ये सुद्धा रेड अलर्ट देण्यात आला आहे. काही ठिकाणी २०५ मीमीहून अधिक पावसाची नोंद होईल, असा इशारा सुद्धा हवामान विभागाने दिला आहे. दरम्यान, पालघर, ठाणे, मुंबई आणि रायगड या जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. विजांच्या कडकडासह वाऱ्यांचा वेग ५० ते ६० किमी प्रति तास राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. दरम्यान उद्या सुद्धा कोकणामध्ये सर्वत्र मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मुंबईमध्ये पुढील २४ तासांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा मुंबईकरांची दैना उडण्याची शक्यता आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने अल्पसंख्याक विभागाला मजबुती

## शहरभरात ३० पदाधिकाऱ्यांची शहराध्यक्ष तुषार कामठे यांच्या मार्गदर्शनाखाली नियुक्ती..!

**पिंपरी । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पिंपरी चिंचवड शहर जिल्हा यांच्या अल्पसंख्यांक सेलला अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने आज शहरातील ३० कार्यकर्त्यांची विविध पदांवर नियुक्ती करण्यात आली. पिंपरी येथील पक्ष कार्यालयात मान्यवर पदाधिकाऱ्यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन विविध पदांवर कार्यकर्त्यांना नियुक्त करण्यात आले.

यामध्ये अख्तर शेख, इशरार मजीद शेख, मोहम्मद कलीम, मुर्तुजा चौधरी, शाहीद चौधरी, शहाबुद्दीन हलीम शेख, नफीस नसीम शेख, नजीर मयूर शेख, श्याम शेट्टी, सनी भाई शेख, मोईनुद्दीन शकील शेख, साजिद शेख, अब्बू शेख, अनिज मोईन शेख, अजुद्दीन शमदा शेख,




इलियान शेख, नियाज शेख, अब्दुल रौफ रजाक शेख, फिरोज एम शेटा, असीम अहमद शेख, मुबीन हसन शेख, मोईनुद्दीन शेख, हबीब गफार शेख, मोहम्मद शेख, नजीर मोईन शेख, अनिल शेख, मोईन शेख, अब्दुल रजाक शेख, अलीम शेख, शेख अजमुद्दिन, शमशाद शेख, नसीम शेख, हसन अब्बास शेख आदी मान्यवर पदाधिकाऱ्यांची अल्पसंख्याक सेलच्या विविध पदांवर शहराध्यक्ष तुषार कामठे, कार्याध्यक्ष देवेंद्र तायडे, माजी नगरसेवक गणेश मामा भोंडवे, विनायक रणसुभे, सागर चिंचवडे, अल्पसंख्यांक विभाग अध्यक्ष अल्ताफभाई शेख यांच्या उपस्थितीत नियुक्ती करण्यात आली. नवनियुक्त सर्व पदाधिकाऱ्यांचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पक्षाच्या वतीने अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

# सर परशुरामभाऊ महाविद्यालयात मुलांच्या वसतिगृहात आगीची घटना; अग्निशमन दलाकडून आग आटोक्यात

**पुणे । प्रतिनिधी**

सर परशुरामभाऊ महाविद्यालयात सकाळी ७ वाजल्याच्या सुमारास आग लागल्याची घटना घडली. महाविद्यालयातील मुलांच्या वसतीगृहात विद्युत पुरवठा करणाऱ्या सिटी मीटरमध्ये ही आग लागली होती. या घटनेची माहिती मिळकाच अग्निशमन दल घटनास्थळी रवाना झाले होते. सध्या अग्निशमन दलाकडून आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले. या घटनेत सुदैवाने कोणीही जखमी झाले नाही.

अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचताच जवानांच्या निदर्शनास आले की, सदर ठिकाणी असणाऱ्या मुलांच्या वसतिगृहात भिंतीच्या बाहेरील बाजूस विद्युत पुरवठयासाठी वापरात असलेला सीटी मीटरने पेट घेतला होता व यादरम्यान मोठ्या प्रमाणात आवाज झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये घबराट निर्माण झाली होती. परंतु, त्याचवेळी तेथील कर्मचारीवर्ग यांनी तातडीने



अग्निरोधक उपकरण (फायर एक्स्टिंग्युशर) वापरुन आग विझवण्याचा प्रयत्न करत अग्निशमन दल व महावितरण विभागास संपर्क केला होता. जवानांनी घटनास्थळी पाहणी करुन आग पुर्ण विझवत धोका दुर केला. त्याचवेळी महावितरणकडून पर्वती विद्युत विभागाचे कर्मचारी वेळेत दाखल होत त्यांनीदेखील पाहणी करुन पुढील कार्यवाही केली. या घटनेत सुदैवाने जखमी कोणी नाही.

या कामगिरीत जनता वसाहत अग्निशमन केंद्र येथील वाहनचालक सागर देवकुळे व फायरमन महेंद्र सकपाळ, उमेश शिंदे, सागर पाटील, विजय वाघमारे यांनी सहभाग घेतला. ग्निशमन दल शहर परिसरात विविध आस्थापना तसेच रहिवासी इमारती, शाळा, महाविद्यालये, रुग्णालय, मॉल वा इतर ठिकाणी घेत असलेले अग्निविषयक सुरक्षा व उपाययोजना यांचे व्याख्यान व प्रात्यक्षिके यामुळे आज महाविद्यालयातील कर्मचार्यांनी प्राथमिक स्वरुपात अग्निरोधक उपकरण वापरत आग विझवण्याचा प्रयत्न केला.

# कामगार कल्याण मंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त वृक्षारोपण

**आंबेठाण । प्रतिनिधी**

वराळे (ता. खेड) येथे महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त चाकण भागातील विविध कंपन्यांमधील कामगार व संस्कार प्रतिष्ठानच्या सहकार्याने वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी आंबा, जांभूळ, चिंच, वड, पिंपळ अशी जवळपास ४०० रोपे लावण्यात आली.

यावेळी कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे, सुजाता इळवे, प्रभारी सहाय्यक कल्याण आयुक्त मनोज पाटील, चाकण कामगार कल्याण केंद्राचे अविनाश राऊत, वनरक्षक सागर चव्हाण, ओम पवार, रॉस प्रोसेसिंगचे गौरव गुरव, गोविंद तालिमकर, मोहन गायकवाड, संदीप गावडे, केंद्र संचालक प्रदीप बोरसे, अनिल कारळे, अरुण वाडकर, शंकर नाणेकर, अण्णा जोगदंड, काळूराम लांडगे, महंमद शफी मुलाणी, मिथुन पाटील, राजगुरुनगर कामगार कृती समितीचे सदाशिव आमराळे, दत्तात्रेय दगडे, प्रकाश पटारे, दीपक निकुमे, गोकूळ भामरे, बापू पाटील, राहुल देवरे, शशिकांत धनगर, नितीन पाटील, संदीप सूर्यवंशी, कृष्णदेव थोरात, ज्ञानेश्वर कळमकर व दत्तात्रेय धावडे उपस्थित होते. यावेळी लॉरियाल, अँसल, सीआयई भोसरी, टाटा मोटर्स, व्हेरॉक, मिंडा, बजाज, स्कोडा कंपनी तसेच विविध कंपन्यांमधील कामगार, युनियन प्रतिनिधी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप बोरसे यांनी तर आभार अविनाश राऊत यांनी मानले.

# हेल्मेट परिधान न केल्याचा चक्क रिक्षाचालकाला दंड

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात दुचाकीसोबत माणसाला टोइंग करून गाडीत चढविल्याचा, टोइंग करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून मारहाणीचा, तर नुकताच वाहतूक पोलिसांवर पेट्रोल ओतून जाळण्याचा प्रयत्न केल्याच्या अजब घटना घडल्या असतानाच त्यात वाहतूक पोलिसांशी निगडित आणखी एका घटनेची भर पडली आहे.



पोलिसांनी वाहतूक एका रिक्षाचालकाला हेल्मेट न घातल्याप्रकरणी दंडाची नोटीस बजावली आहे. जर दंडाची रक्कम नाही भरली, तर तुमच्यावर न्यायालयात खटला भरला जाईल, असेही नोटिशीमध्ये सूचित करण्यात आले आहे. वाहतूक पोलिसांचा अशा प्रकारामुळे समाज माध्यमांवर हा प्रकार चांगलाच व्हायरल झाला आहे. शहरातील वाहतुकीचा प्रश्न चांगला तापत असताना दुसरीकडे वाहतूक नियंत्रण करण्यासाठी व नियम-अटी पाळल्या जाव्यात, यासाठी चौका चौकात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. मात्र, असताना एका रिक्षाचालकाला हेल्मेट घातले नाही म्हणून दंडाच्या रकमेबाबत नोटीस पाठविण्यात आली. तसेच, त्याला ही रक्कम न भरल्यास न्यायालयात खटला भरण्याबाबतही सूचित करण्यात आले आहे. प्रत्यक्षात दुचाकीवर हेल्मेट न घातल्याबद्दल दंड ठोठावण्यात येतो. मात्र, रिक्षावर हेल्मेट नसल्याचा दंड ठोठावताना संबंधित कर्मचाऱ्याकडून असा प्रकार कसा घडला, असा प्रश्न आता यानिमित्ताने उपस्थित होऊ लागला आहे.

याबाबत रिक्षाचालकाने लागलीच पुणे जिल्हा महाराष्ट्र वाहतूक शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) दत्तात्रय घुले यांना माहिती दिली. त्यानंतर वाहतूक पोलिसांचा हा गलथान प्रकार समोर आला आहे. प्रत्यक्षात ही बाबत तांत्रिक चुकीमुळे झाली असण्याची शक्यता पाहता व न्यायालयात खटला जाण्याची शक्यता पाहता नोटीस काढणाऱ्या किंवा मेसेज पाठविणाऱ्या कर्मचाऱ्यांनी याबाबतीत सतर्क राहिले पाहिजे, अशी अपेक्षा सामान्य नागरिक व्यक्त करत आहेत.

# गणेगावच्या कालव्यावरील पुलास भगदाड

**शिरूर । प्रतिनिधी**

गणेगाव खालसा (ता.शिरूर) येथील गणेगाव-हिवरे-केंदूर रस्त्यावरील चासकमान कालव्यावरील पुलाला भगदाड पडले आहे. यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. पुलाच्या संरक्षण कठड्यांची दुरवस्था झाल्याने ग्रामस्थ व विद्यार्थ्यांना जीव धोक्यात घालून पुलावरून प्रवास करावा लागत आहे.

केंदूर रस्ता वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा असून, शेतकरी शेतमाल वाहतुकीसाठी या रस्त्याचा वापर करतात. या रस्त्यावरील चासकमान कालव्यावरील पुलावर पावसाचे पाणी साचून पुलाला भगदाड पडले आहे. तसेच पुलावर मोठ्या प्रमाणात चिखल साचला आहे. रात्रीच्या वेळी वाहनचालकांना खड्ड्यांचा अंदाज न आल्याने छोटे मोठे अपघात घडत आहे. त्यामुळे चासकमान पाटबंधारे विभागाने या पुलाचे तातडीने स्टक्चर ऑडिट करावे. तसेच पुलाची त्वरित देखभाल दुरुस्ती करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. चासकमान कालव्यावर पुलाची दुरवस्था झाली असून, पुलाचे तातडीने स्टक्चर ऑडिट करावे. तसेच पुलाची तत्काळ देखभाल दुरुस्ती करावी. यासाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायत शिरूर यांच्या वतीने जुलै २०२३ मध्ये पत्रव्यवहार करण्यात आला होता. मात्र, वर्षभरानंतर ही काम जैसे थे अवस्थेत आहे. निधी उपलब्ध नसल्याचे तोंडी कारण देत चासकमान पाटबंधारे विभागातील अधिकारी समस्येकडे काणाडोळा करत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

# सुवर्णभूमी थायलंडवरून आलेल्या भिक्खु संघाचे आ.आशुतोष काळेंनी केले स्वागत

**कोपरगाव । प्रतिनिधी**

लुम्बीनी बुद्ध विहार कोपरगाव येथे दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया, समता सैनिक दल व अखिल भारतीय भिक्खु संघ यांच्या संयुक्त विद्यमाने सुवर्णभूमी थायलंड येथून पु लुअंगपौ विरीयांग सिरिन्धरो यांचे मार्गदर्शन घेऊन आलेल्या भिक्खु संघाचे आ.आशुतोष काळे यांनी स्वागत करून त्यांचे आशीर्वाद घेतले.

सुवर्णभूमी थायलंड येथून पु लुअंगपौ विरीयांग सिरिन्धरो यांचे मार्गदर्शन घेऊन आलेल्या भिक्खु संघाचे कोपरगाव शहरात अखिल भारतीय भिक्खू संघ व भारतीय बौद्ध महासभा सर्व उपासक-उपासिका कोपरगाव तालुका व शहराच्या वतीने



लुम्बीनी उपवन बुद्ध विहार कोपरगाव येथे भव्य स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास आ. आशुतोष काळे यांनी उपस्थित राहून भिक्खु संघाचे कोपरगाव मतदार संघाच्या वतीने स्वागत केले. यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक ते लुम्बीनी उपवन बुद्ध विहार पर्यंत धम्म रॅली काढण्यात आली. या धम्म रॅलीमध्ये उपासक-उपासिका मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

सुवर्णभूमी थायलंड वरून आलेल्या भन्ते मिलिंद बोधीजी, भन्ते अमृतानंदजी भन्ते आनंद सुमनसिरीजी, भन्ते दिपंकरजी, भन्ते कश्यपजी, भन्ते भारद्वाजजी, भन्ते धम्मसिरीजी, भन्ते थेवाधम्मोजी यांच्या ज्ञानाच्या शिदोरीचा व शिकवणीचा समाजाच्या जडणघडणीत निश्चितपणे फायदा होईल असा विश्वास यावेळी आ.आशुतोष काळे यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया, समता सैनिक दल, अखिल भारतीय भिक्खु संघाचे सदस्य, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, माजी नगरसेवक, कार्यकर्ते व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्य उत्पादन शुल्कच्या छाप्यात साडे चार लाखांचा मुद्देमाल जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाच्या भरारी पथकाने माहिती मिळाल्यानुसार शिरूर तालुक्यातील आपटी गावाच्या हद्दीत टाकलेल्या छाप्यात १ हजार २२५ लीटर गावठी दारुसह चारचाकी वाहन असा ४ लाख ७६ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

भरारी पथकाने आपटी गावातील भामा नदीच्या कडेला, पोल्ट्री फार्मजवळ कच्च्या रस्त्यावर सापळा रचून संशयित टाटा कंपनीच्या टेम्पो वाहन क्रमांक एमएच १४ एचयु ९५६० या वाहनाची तपासणी केली असता वाहनामध्ये ३५ लिटर क्षमतेच्या ३५ प्लॅस्टिक कॅनमध्ये १ हजार २२५ लीटर गावठी दारू आढळून आली. वाहनचालक भाऊसाहेब बबन भोसले यास ताब्यात घेवून वाहनासह एकूण ४ लाख ७६ हजार रूपयांचा दारुबंदी गुन्ह्यातील मुद्देमाल जप्त करण्यात आला. संबंधित आरोंपीविरूद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ च्या तरतुदीनुसार गुन्हे नोंद केलेले आहेत. पुणे पथकाचे निरीक्षक देवदत्त पोटे, दुय्यम निरीक्षक बी. एस. घुगे, डी. एस. सुर्यवंशी, जवान सुरज घुले, जयराम काचरा, मुकुंद पोटे, शरद हांडगर व महिला जवान शाहीन इनामदार यांच्या पथकाने ही कारवाई पार पाडली. अवैध मद्य निर्मिती, विक्रीबाबत कोणास माहिती मिळाल्यास तात्काळ राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाशी संपर्क करावा, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक क्रमांक १ चे निरीक्षक देवदत्त पोटे यांनी केले आहे.

# डोईफोडे कुटूंबीयांकडून वारकऱ्यांची सेवा

## मुलांनी आपल्या बचतीचे पैसे वापरून दिला सकारात्मक संदेश

**पुणे । प्रतिनिधी**

सालाबादप्रमाणे यंदाही शिवाजीनगर पुणे येथे कृषी अधिकारी म्हणून कार्यरत असणाऱ्या श्री.अनिल भगवान डोईफोडे कुटूंबियांच्या वतीने संतश्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात सहभागी हजारो वारकऱ्यांची चहा, नाष्टा व अंघोळीची सोय करत सेवा करण्यात आली.





संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात माऊलींच्या निरा नदीतील पादुका स्नानाला अतिशय महत्व आहे. वाल्हे गावात मुक्काम केल्यानंतर निरेतील स्नानापर्यंतच्या जवळपास ११ किमींच्या मार्गात पिंपरे निरा, ता.पुरंदर येथे डोईफोडे कुटूंबियांचे घर असून, गेल्या कित्येक वर्षांपासून नित्यनियमाने ते वारकऱ्यांच्या संपूर्ण नाष्ट्याची सोय करतात. यासह वारकऱ्यांना अंघोळीची देखील ते सोय करतात. यंदाच्या सेवेचे वैशिष्ठ म्हणजे हर्षदा, श्वेता आणि शंभुराज या डोईफोडे कुटूंबातील मुलांनी आपले स्वतः बचत करून जमवलेले पैसे वारकऱ्यांच्या सेवेसाठी वापरत समाजसेवेचा एक नवीन पायंडा पाडला आहे.

यावेळी बोलताना, श्री.अनिल डोईफोडे म्हणाले की, वारी आणि वारकरी हा प्रत्येकाच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. त्यात, आमचे घर संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी मार्गावर आहे. त्यामुळे, पाच वर्षांपूर्वी पालखीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांची आपल्या परिने सेवा करण्याचा निर्णय मी घेतला. या निर्णयाला माझी पत्नी स्वाती हिने देखील हातभार लावला. यंदा माझी द्वितीय कन्या श्वेता हिने स्वतःच्या बचतीचे पैसे माझ्या हातात ठेवले. त्यापाठोपाठ माझ्या अन्य अपत्यांनी देखील पुढाकार घेत त्यांच्या बचतीचे पैसे वारकऱ्यांसाठी खर्च करण्यासाठी देऊ केल्याने, अतिशय आनंद आणि अभिमान देखील वाटला. आपला वारकरी सेवेचा वसा आता नव्या पिढीकडे हस्तांतरीत होत असल्याचे पाहून समाधान देखील वाटले, असेही ते पुढे म्हणाले.

प्रतिष्ठीत निरा स्नान झाल्यानंतर माऊलींची पालखी लोणंद येथील मुक्कामाकडे पाचरण झाली.

# पोलिसांना उडवलं अन् घरी जाऊन झोपला... पुणे हिट अँड रन प्रकरणात मोठा खुलासा

पुणे । प्रतिनिधी

पोलिसांना धडक दिल्यानंतर कारचालकाने कार घरापासून काही अंतरावर पार्क केली. त्यानंतर तो घरी जाऊन झोपला होता. कार लांब लावल्यानंतर पोलिस आपल्या घरापर्यंत पोचू शकणार नाहीत, असे त्याला वाटले होते. मात्र पोलिसांनी सीसीटीव्ही तपासत गाडीच्या नंबरवरुन माहिती काढली आणि कारचालकाला पकडले.

सिद्धार्थ राजू केंगार (रा. औध) असे कारचालकाचे नाव आहे. त्याला पोलिसांनी अटक केली आहे. केंगार हा एका मोटारीच्या शोरूममध्ये कामाला आहे. तर अपघात झालेली गाडी मुकेश अटवाल याच्या नावावर आहे. पोलिस आता गाडीमालकचा शोध घेत असल्याची माहिती पोलिस उपायुक्त विजयकुमार मगर यांनी दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कोळी यांची १५ दिवसांपूर्वीच वाहतूक शाखेतून खडकी पोलिस ठाण्यात बदली झाली होती. रविवारी रात्री त्यांची बीट मार्शल म्हणून ड्यूटी होती. त्यांच्या सोबत पोलिस शिपाई संजोग शिंदे यांना देण्यात आले होते. संजोग शिंदे हे दुचाकी चालवत होते तर समाधान कोळी हे मागे बसले होते. त्यांनी रात्री दीडच्या सुमारास बोपोडी येथील एका पॉइंटला भेट दिली. तेथे नेहमीप्रमाणे पोलिसांच्या पवर दोघांनी भेट दिल्याचा सेल्फी टाकला. यानंतर ते पुढील पॉइंटवर भेट देण्यासाठी निघाले आणि अवघ्या दहा मिनिटांतच त्यांच्या दुचाकीला अंडरपासजवळ मागून भरधाव वेगात आलेल्या कारने उडवले.

पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजचा शोध घेऊन अपघात करून पळ काढलेल्या कारचा शोध घेतला. तेव्हा कार चालकाने कार घरापासून लांब लावल्याचे आढळून आले. अपघातानंतर कार चालक घरी जाऊन झोपला होता. या प्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक गिरीश दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.